मार्च २०२३

# जीवनविद्येचा दीपस्तंभ



माई म्हणजे नामधारकांची आई..
हृदयातील कान्हाई, कृष्णाई....
माई तू प्रेमाचा झरा..
माई तुझा हसतमुख चेहरा....
माई तुझी मायेची नजर..
माई तूच करुणेचा पाझर....
माई तू कर्तव्याची जाग..
माई तूची परमोच्च त्याग....
माई तुझी ज्ञानोपासना..
माई तुझ्यात सहज साधना....
माईंचे तुझे साधेपण..
माई तुझ्यात सद्‌गुरू स्मरण....
माई म्हणजे आत्मत्व..
माई म्हणजे सद्‌गुरूत्व..



## प्रत्येक कृती ही राष्ट्रहिताची, विश्वशांतीची..

जीवनविद्येचा ई दीपस्तंभ मार्च - २०२३
वर्ष १ ले
अंक १७ वा

# अनुक्रमणिका


| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १) | संपादकीय | ३ | ११) | बालकट्टा- सर्वांना यश मिळू दे | २२ |
| २) | सिंचन ज्ञानामृताचे | ४ | १२) | माईंची आठवण | २३ |
| ३) | प्रल्हाद वाणी | ८ | १३) | प्रश्न तुमचे उत्तर श्री प्रल्हाददादांचे | २५ |
| ४) | अमूच्या माई | ११ | १४) | मन मंदिरा | २८ |
| ५) | जाणे माउलीचे चित्त | १४ | १५) | काव्यांजली | २९ |
| ६) | तेजोवलायांकीता शारदा | १६ | १६) | महत्वाकांक्षेला जीवनविद्येची जोड | ३१ |
| ७) | नाथांची गिरीजा आणि.... | १८ | १७) | पर्यावरण हाच नारायण | ३२ |
| ८) | बालकट्टा-संस्कार कथा | १९ | १८) | पुण्यस्मरण एक आनंद सोहळा | ३४ |
| ९) | बालकट्टा- मी काय मिळविले | २० | १९) | महिला सन्मान | ३५ |
| १०) | बालकट्टा- संगत यशाची | २१ | २०) | कोर्सेसचा आनंद | ३५ |


संपादिका : सौ. शिल्पा ढगे, बी. ए.

**सहसंपादक : डॉ. सौ. प्रभा मोदी.** M.S.(Mum.), F.R.C.S. (England) / **श्री. अरविंद चौधरी.** ICWA, M.Com., B.A.

**मुद्रक : प्रकाशक : सौ. शिल्पा ढगे** यांनी जीवनविद्या मिशन, मुंबई यांच्यासाठी,
**जीवनविद्या मिशन,** 'भक्तियोग', २८ ए, दत्ताराम लाड मार्ग, काळाचौकी, मुंबई - ३३. भ्रमणध्वनी : ९१६७७५५२१४ येथून प्रसिद्ध केला.
**बोरीवली प्रशासकीय कार्यालय** : ए - 2, सिद्धार्थ नगर बि. क्र. ५, को.ऑप.हौ.सोसायटी, धीरज उपवन समोर ,
पश्चिम द्रुतगती मार्गाजवळ, बोरीवली (पूर्व), मुंबई - ६६. दूरध्वनी : ०२२ २८८७९०१५ -०१६ ,भ्रमणध्वनी :९९३०४ ९९३०५

www.jeevanvidya.org Email: ho@jeevanvidya.org / office@jeevanvidya.org


| कार्यकारी मंडळ | मुखपृष्ठ संकल्पना | सहकार्य |
|---|---|---|
| श्री. ए. जी. बेळवेकर<br>सौ. अनिता मोरे | श्री. विठ्ठल घाडी<br>काव्य : अनिता मोरे | कांचन पालव, स्वाती संदाशी<br>विनया हडकर, हेमांगी पवार |

SUBSCRIBE US ON @ JEEVANVIDYAMISSION www.youtube.com/jeevanvidyaMission
LIKE US ON @ JEEVANVIDYAMISSION www.facebook.com/jeevanvidya
FOLLOW US ON @ JEEVANVIDYA www.twitter.com/jeevanvidya
FOLLOW US ON @ JEEVANVIDYAOFFICIAL www.instagram.com/jeevanvidyaofficial

# संपादकीय...

अनेक रुपे तुझी वनिता जीवन तू फुलविते
नव्या युगाची भाषा समजून उंच भरारी घेते।।

८ मार्च, अर्थात जागतिक महिला दिन. जीवनविद्या सांगते स्त्री आणि पुरुष ही परस्परपूरक नैसर्गिक पद्धतशीर व्यवस्था आहे. गर्भधारणा आणि प्रसुती यासारखी अत्यंत कष्टप्रद, पण सुंदर सृजनात्मक कार्याची जबाबदारी निसर्गाने स्त्रीवर सोपवली आहे. ही जबाबदारी आनंदाने निभावत असताना काळासोबत बदलत ती रोजच स्वत:चे पंख मजबूत करत असते! परंतु आजही अशा अनेक स्त्रिया आहेत ज्यांना घर आणि करिअर यांची सांगड घालताना करिअर सोडावे लागते. कारण त्यांना घरातून म्हणावे तसे सहकार्य मिळत नाही.

राज्यलक्ष्मी रेड्डी या भारतातील पहिल्या महिला इंजिनिअर! अतिशय बुद्धिमान आणि कतृत्ववान स्त्री! पतीच्या बदलीच्या नोकरीमुळे राज्यलक्ष्मी यांनाही पतीसोबत वेगवेगळ्या राज्यात जावे लागले. संसार सुखाचा होण्यासाठी त्यांनी मुलांसाठी व पतीसाठी इतक्या वेळा तडजोड करुनही स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण केले.

भारतातील पहिली महिला डॉक्टर आनंदीबाई जोशी, आपल्या देशातील महिलांना पुरुष डॉक्टरांकडे जाण्यास संकोच वाटत होता हे पाहून १८८७ साली जिद्दीने एकट्या अमेरिकेत शिक्षण घेण्यासाठी गेल्या. जरी त्या अल्पायुषी ठरल्या तरी इतर अनेक स्त्रियांना शिक्षण घेण्यासाठी त्यांनी प्रेरणा दिली. राष्ट्रप्रगतीच्या दृष्टीने त्यांचे हे योगदान खूप मोलाचे आहे.

भारतातील पहिल्या महिला पोलिस अधिकारी किरण बेदी यांनी त्यांच्या क्षेत्रात विशेष स्थान निर्माण करत सामाजिक परिवर्तनात खूप मोठे योगदान दिलेले आहे. त्यांना सुद्धा मुलगी म्हणून घरातून लादल्या जाणाऱ्या बंधनांना सामोरे जावे लागले होते.

छत्रपती शिवाजी महाराजांना घडविणाऱ्या जिजामाता, उत्तम राज्यकारभार करत असताना समाजसुधारणेचे कार्य करणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर तसेच भारतीय स्त्रीवादाची जननी समजल्या जाणाऱ्या पहिल्या महिला शिक्षिका, समाजसुधारक, शिक्षणतज्ज्ञ सावित्रीबाई फुले अशा आदरणीय, वंदनीय स्त्रियांनी देशाचा इतिहास रचला आहे.

एका स्त्रीने ठरवले तर ती काहीही करू शकते. परंतु हे करत असताना निसर्गाने दिलेली मातृत्वाची जबाबदारी पार पाडण्यासाठी ती प्रसंगी एक पाऊल मागे येते. ती काळासोबत वाटचाल करत असताना वैयक्तिक प्रगतीबरोबरच राष्ट्राच्या प्रगतीमध्ये योगदान देते. पण कुटुंबाशी असलेले भावनिक बंध ती तसेच जोडून ठेवते. ही भावनिक गुंतवणूक तिची कमजोरी नाही तर ताकद आहे. कारण त्यावरच कुटुंबव्यवस्था टिकून आहे. घर सांभाळून मुलांना सुसंस्कार देणारी प्रत्येक माता ही राष्ट्राचे भविष्य घडवत असते. अशा सर्व माता-भगिनींना दीपस्तंभतर्फे जागतिक महिला दिनाच्या मनापासून शुभेच्छा!





# सिंचन ज्ञानामृताचे

## सुख हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे. भाग १४

आपण जो विषय घेतलेला आहे तो म्हणजे सुख हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे”. सुख हे जगातील प्रत्येक व्यक्तीला हवे असते व हे सुख तीन प्रकारचे असते. शारीरिक, मानसिक व आत्मिक यापैकी शारीरिक सुखाबद्दल खूप सांगितले. मानसिक सुखाबद्दल सद्या विषय चाललेला आहे. ते सांगत असताना मी असे सांगितले कि आपल्याला जीवनात जर शांती हवी असेल तर पुण्य गाठी व पाठी दोन्ही पाहिजे. हे पुण्य इतके महत्वाचे आहे जिथे पैसा उपयोगी पडत नाही तिथे पुण्य उपयोगी पडते. पुण्य संपादन करण्याचे मार्ग चोखाळणे आवश्यक आहे. आज लोकांना पैसा दिसतो पण पुण्य दिसत नाही. पैसा मिळविण्यासाठी धावतात पण पुण्याबद्दल त्यांना काही कल्पनाही नाही. ते मिळवायचे असते हे हि ठावूक नाही. आज जगात दु:ख भरलेले आहे. ते दु:ख किती ? सुख पहाता जवापाडे दु:ख पर्वताएवढे हे तुकाराम महाराजांनी सांगून ठेवलेले आहे. कुठे जव व कुठे पर्वत “सुख पहाता जवापाडे दु:ख पर्वताएवढे” याचे कारण लोकांना पैशाचे महत्व कळते पण पुण्याईचे महत्व कळत नाही. जेव्हा लोकांना पुण्याईचे महत्व कळेल व ते मिळविण्याचा प्रयत्न करतील तेव्हा जगात खरी क्रांती होईल. आज पाप कशाला म्हणायचे ? पुण्य कशाला म्हणायचे हेच लोकांना कळत नाही. पाप पुण्याच्या कल्पना ठिसूळ झालेल्या आहेत. कर्मकांडे केली नाहीतर परमेश्वराचा कोप होणार ही समजूत मुळात चुकीची आहे. जीवनविद्या सांगते, खरे पाप व खरे पुण्य समजून घेतले तर तुम्हांला जीवनात पैसा व पुण्य ह्यांचा balance करता येईल. पैसा तर पाहिजे व पुण्य ही पाहिजे. पैसा व पुण्य ह्यांचा balance होतो तेव्हा माणूस खऱ्या अर्थाने सुखी होतो. पक्ष्याला जसे दोन पंखाची आवश्यकता असते तसे पुण्य व पैसा दोन्हींची आवशक्यता असते. छोट्या छोट्या गोष्टीतून पुण्य मिळविता येते. मी मागल्या खेपेस मोठमोठ्या गोष्टी सांगितल्या. देहदान, अन्नदान ह्या गोष्टी सांगितल्या.



काही लोक म्हणाले, आमचा देहदानाचा अनुभव वेगळा आहे. एक नामधारक म्हणाले, माझ्या आईने देहदान केले होते तेव्हा नाना तऱ्हेचे procedure follow करावे लागले व त्या procedure मध्ये अडथळे आणणारे लोक असतात. नको ते देहदान व नको ते पुण्य असे म्हणण्याची वेळ येते म्हणून ह्याबाबतीत procedure simplify केल्या पाहिजेत व लोकांना देहदान करण्यास प्रवृत्त केले पाहिजे. देहदान करताना ज्या नाना तऱ्हेचे प्रोसेस करताना कष्ट होतात ते होऊ नयेत याची काळजी संबंधितांनी घेतली पाहिजे. देहदान व नेत्रदान हे पुण्य कमविण्याचे मार्ग आहेत. मलाही देहदान करण्याची इच्छा होती पण ह्या सर्व गोष्टी ऐकल्यावर मी तो कागद फाडून टाकला. सरकारने ह्या गोष्टीत लक्ष घातले पाहिजे व लोक देहदान करण्यास तयार होतील असे काहीतरी

केले पाहिजे. त्यासाठी संबंधित लोकांनी त्यात लक्ष घातले पाहिजे. देहदान, नेत्रदान, ज्ञानदान ! पूर्वीच्या काळी शिक्षक पैशासाठी शिकवत नव्हते तर मुलांनी शिकावे, मुलांनी मोठे व्हावे अशी त्यांची इच्छा असायची, आवडीने शिकवायचे मग लोक क्लासला कशाला जातील. आता शाळेत शिकवत नाहीत म्हणून ते क्लासला जातात. शिकविणे हे सुद्धा पुण्य आहे. शिक्षकांनी लक्षात ठेवायचे, मुलांना ज्ञानी करण्यासाठी शिकवायचे आहे. ह्या ज्ञानदानाचा एक फायदा असा की ज्ञान दिल्याने वाढते. तुम्ही जितके लोकांना ज्ञान द्याल तितके तुमचे ज्ञान वाढत जाईल. मी नेहमी सांगतो, शिकविण्याचे जे मार्ग आहेत त्यात शिकविता शिकविता शिकणे हा एक उत्तम मार्ग आहे. शिकविता शिकविता शिकणे ह्या मार्गात प्रथम तुम्हांला शिकावे लागते. तुमच्या ठिकाणी त्यांची clarity यावी लागते. तुमच्या ठिकाणी त्याची clarity येते तेव्हा चांगल्या तऱ्हेने शिकवू शकता. तुमच्या ठिकाणी त्याची clarity असली पाहिजे, कुठल्याही तऱ्हेचा संदेह असता कामा नये.

सांगायचा मुद्दा, शिकविता शिकविता शिकणे हा एक उत्तम मार्ग आहे. शिकविणे म्हणजे ज्ञानदान करणे हा पुण्य कमविण्याचा मार्ग आहे. त्याचप्रमाणे आर्थिक सहाय्य करणे म्हणजे डोनेशन देणे हा पुण्य मिळविण्याचा मार्ग आहे. काही लोक कसे असतात, वाईट मार्गाने पैसा मिळवितात व कुठेतरी दानधर्म करतात. असे प्रकार चाललेले असतात. दुसऱ्यांना फसवून पैसा मिळवायचा व दानधर्म करायचा हे सुद्धा बरोबर नाही. जरी ते बरोबर नसले तरी त्यात चांगला भाग असा कि पैसा वाईट मार्गाने मिळविला पण तो चांगल्या गोष्टीसाठी वापरला तर त्यातून पुण्य मिळेल पण वाईट काम केले त्याबद्दल शिक्षा सुद्धा होणारच व डोनेशन दिले त्याबद्दल चांगला मोबदला मिळेल. दोन्ही होईल पुण्य मिळवण्याचे अनेक मार्ग आहेत. तुमच्या हातात सत्ता आहे तर अनेक लोकांना नोकरीला लावू शकता, पण नोकरीला लावताना पैसे खाऊ नका. ती लाच आहे पुण्य मिळवायचे असेल तर पैसे घेऊ नका. लाच घेतली तर त्याप्रमाणे शिक्षा होणार. ती निसर्ग नियमाप्रमाणे जीवनविद्येने दोन महत्त्वाच्या गोष्टी सांगितल्या. तुमचे कर्म व निसर्ग नियम इथे परमेश्वराचा संबंध येत नाही. जीवनविद्या सांगते, तुमच्या जीवनाशी परमेश्वराचा संबंध नाही. संबंध आहे तो तुमचे कर्म व निसर्ग नियम. यातून तुमचे जीवन खुलत असते फुलत असते आपण परमेश्वराला मध्ये आलतो हे खोटे आहे कालच मला एका माणसाने फोन केला होता व फोनवरून तो परमेश्वराला शिव्या घालत होता त्याने परमेश्वरासाठी असे शब्द वापरले आम्ही एवढे करूनही परमेश्वरने आमच्या तोंडात शेण घातले देवाचा येथे काही संबंध नाही तू तुझ्या तोंडात शेण घातले म्हणून तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार.

माणसे आज दोष देतात ते स्वतः सोडून इतरांना देतात मी बरोबर व इतर चूक ही धारणा असते माझे चूक असू शकते व इतर बरोबर असू शकतात हा विचारच करत नाहीत यालाच



अविचार म्हणतात आज जगात दुःख का आहे? शहाणपणाचा अभाव ! घराघरात भांडणे का? शहाणपणाचा अभाव  शेजारी शेजाऱ्यांमध्ये भांडणे का? शहाणपणाचा अभाव! नातेवाईक एकमेकांशी भांडतात का? शहाणपणाचा अभाव! समाजातील निरनिराळ्या जाती जमाती मध्ये भांडणे होतात का? शहाणपणाचा अभाव! राष्ट्रा राष्ट्रांमध्ये युद्ध लढाया का ? शहाणपणाचा अभाव! शहाणपणाचा अभाव हेच एकमेव कारण आहे. इथे परमेश्वर येत नाही हा जीवनविद्येचा सिद्धांत आहे. परमेश्वराला मध्ये आणतो हेच मुळात चुकीचे आहे. परमेश्वराला शिव्या देतो हेच मुळात चुकीचे आहे. परमेश्वराने काय दिलेले आहे याची तुला कल्पना नाही. एवढे मोठे शरीर सर्व इंद्रियांनी युक्त, डोळे, हातपाय, नाक कान, त्याहीपलीकडे आतील यंत्रणा, त्याहीपलीकडे मन, चित्त, बुद्धी हे सर्व देवाने दिलेले भांडवल आहे, याचा योग्य वापर करायचा व तू तुझे जीवन सुखी करायचे की दुःखी करायचे हे तुझ्या हातात आहे, म्हणून "तूच आहे तुझ्या जीवनाचा शिल्पकार"



देवाने जे दिलेले आहे त्याचा वापर कसा करायचा हे तुझ्या हातात आहे. वापर म्हणजे व्यापार. एका व्यापाराला चार मुले होती. त्याने प्रत्येकाला दहा दहा हजार रुपये दिले व तो तीर्थयात्रेला निघून गेला. पहिल्या मुलाने नको नको ती व्यसने करून ते पैसे फुकट घालवले. दुसऱ्यांचे पैसे जमिनीत पुरून ठेवले. तिसऱ्याने बँकेत ठेवले व चौथ्याने त्या पैशाचा व्यापार केला व दहा हजाराचे लाखो रुपये मिळवले. चौथा शहाणा होता त्याच्यापेक्षा कमी शहाणा तिसरा. त्याच्यापेक्षा कमी शहाणा दुसरा व पहिला मूर्ख. सांगायचा मुद्दा, चौथ्या मुलाने त्या पैशाचा वापर केला तसा देवाने दिलेल्याचा वापर कर. तोंडाचा वापर, कानाचा वापर, हाताचा वापर. हाताचा वापर मारण्यासाठी करायचा की चांगल्या कामासाठी करायचा हे तू ठरव. देव येऊन सांगणार नाही, देव म्हणेल 'मी तुला सगळे दिलेले आहे यापुढे काय करायचे ते तू कर'. व काय भोगायचे ते तू भोग. करायचे व भोगायचे काय करायचे व काय करायचे नाही हे तू ठरव. इथे उपयोगी पडतात ते सद्‌गुरू म्हणून देवापेक्षा सद् गुरू श्रेष्ठ असे म्हणतात. त्याचे कारण हे आहे देव व सद्‌गुरू दोन्ही समोर आले तर पहिला नमस्कार सद्‌गुरूंना करेन असे संत कबीरांनी म्हटले आहे. देव येऊन काही सांगत नाही, पाठीवरून हात फिरवत नाही, पाठीवर धपाटा घालत नाही. सद् गुरूंचे तसे नसते. सद्‌गुरू सांगतात, तू हेच कर तुझे कल्याण होईल, तू ते करू नकोस. सद्‌गुरू



जे मार्गदर्शन करतात त्या मार्गदर्शनाला तोड नाही. तुकाराम महाराज म्हणतात, "मार्ग दावी त्याच्या पुण्या नाही पार होती उपकार अगणित". सद्‌गुरू जे मार्गदर्शन करतात त्या मार्गदर्शनाने हजारो लोक सुखी होतात. कारण त्यांना ज्ञान दिले जाते. या ज्ञानाने ते लोक सुखी झाले. कर्मकांडे केल्याने कोणी सुखी होत नाही. कर्मकांडे केल्याने देवाची कृपा होते, कोप टाळता येतो हे सर्व चुकीचे आहे. हे मी सांगतो तेव्हा लोक माझ्यावर रागावतात व मला नास्तिक म्हणतात. तरी मी हे सांगतो, कारण लोक सुखी व्हावेत हीच माझी इच्छा असते. लोकांना फसविणे सोपे आहे. मी जर ठरवले तर मला ते सोपे आहे. लोकांना फसवून मी करोडो करोडो रुपये कमवू शकतो. पण ते पैसे मला सुख देणार नाहीत, शांती देणार नाहीत, समाधान देणार नाही. लोकांना फसविणे सोपे आहे पण लोकांना शहाणे करणे कठीण आहे. संत लोकांना शहाणे करतात व असंत लोकांच्या मूर्खपणाचा, अंधश्रद्धेचा फायदा उठवतात. आता कुणाकडे जायचे ते तुम्हीच ठरवा म्हणून "तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार".

हे मी का सांगतो आहे, पुण्य कमविण्याचे मार्ग वेगवेगळे आहेत. पुण्य ते परोपकार पाप ते परपीडा. दुसऱ्याला सुखी करणे हेच पुण्य आहे. तुमच्या हातात थोडी जरी सत्ता आली तरी लोकांना सुखी करा. कंडक्टरच्या हातात सत्ता असते त्याचा वापर तो करू शकतो. एखादी बाई धावत येते आहे ती बाई जवळ आली तरी ते बेल मारून बस पुढे नेतात. थोडे थांबलास तर आकाश कोसळणार आहे का ? काही वेळात तर ती बाई पडते सुद्धा. हे कंडक्टरला कळत नाही की जर तू हे केले तर उद्या कदाचित तुझी बायको तशीच पडेल, तुझी आई तशीच पडेल, तुझी बहीण तशीच पडेल, कदाचित तु ही पडशील. कंडक्टरच्या हातात थोडी जरी सत्ता आहे याचा वापर चांगला कर. सांगायचा मुद्दा, तुमच्या हातात थोडी जरी सत्ता आली तरी त्याचा उपयोग लोकांच्या भल्यासाठी करा. खासदार आमदार त्यांच्या हातात केवढी सत्ता असते. ते कितीतरी लोकांचे भले करू शकतात व कितीतरी पुण्य कमावता येईल. त्या पुण्याईच्या बळावर सुख मिळवता येईल हे समजून घ्या. सांगायचा मुद्दा, पुण्य मिळवायचे की पाप मिळवायचे हे तुझ्या हातात आहे. पाप पुण्याच्या खोट्या कल्पना सोडून दिल्या पाहिजेत. दुसऱ्याला दुःख देणे हे पाप दुसऱ्याला सुख देणे हे पुण्य. दुसऱ्याचे कौतुक केले तरी ते पुण्य आहे कौतुक केले की त्याला आनंद होतो. त्याला आनंद झाला की पुण्य मिळाले आता हे पुण्य मिळवायचे की पाप मिळवायचे. हे तू ठरव कारण,

"तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार".

> सर्वत्र एका प्रभूचे अग्र मनाला दाखवीत राहणे याचे नावं एकाग्रता.
>
> **सद्‌गुरू श्री वामनराव पै**





**Conference Call**

२०१२ पासून दर आठवड्याला चार कॉन्फरंस कॉल सुरु आहेत.
प्रत्येक कॉलवर हजारो लॉग इन देश विदेशातून सहभाग.
२५,००० सहभागी.

संग्रह www.jeevanvidya.org/audiocall वर उपलब्ध । कॉन्फरन्स कॉल संग्रहाचा सर्वांनी लाभ घ्या

# प्रल्हादवाणी भाग - १३

## आचरणीय माई....



आचरणीय माई या विषयात आपण माईंच्या बद्दल बोलत आहोत. माईंकडे सेवाभाव ठासून भरलेला आहे. या सेवाभावाचे आचरण आपण केले तर जीवनविद्या मिशनचे कार्य जगभरात खूप लवकर पोहोचेल. आज हजारो कार्यकर्ते सेवाभाव वृतीने कार्य करीत आहेत. परंतु ही संख्या लाखापर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. जे ज्ञान मला मिळाले ते सर्वांना मिळाले पाहिजे ही तळमळ प्रत्येक कार्यकर्त्यात असली तरी जीवनविद्येची ज्योत जगभरात लवकर जाईल. त्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्याला असे वाटले पाहिजे की, आपण आपला काही ना काहीतरी खारीचा वाटा या कार्यात उचलला पाहिजे. प्रत्येकात काहीतरी वेगळे वैशिष्ट्य हे असतेच. प्रत्येक कार्यकर्ता हा कुठल्या ना कुठल्या विषयात हुशार आहे आणि जीवनविद्येच्या कार्यात हे सगळेच लागते. जीवनविद्या मिशन ही संस्था एखाद्या कंपनीसारखी चालवावी लागते. कंपनीच्या उद्योगात नफा कमवला जातो तर आपल्या कार्यात आपण पुण्य कमावतो हा फरक आहे. जीवनविद्येचे प्रचलित उपक्रम चालू ठेवत असतानाच आताच्या मागणीनुसार नवीन उपक्रमाचा सुद्धा आपल्याला समावेश करावा लागतो. नवीन उपक्रम लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी आपल्याला तसे प्रयत्नही करावे लागतात. या सर्व गोष्टींकडे आपल्याला कार्यकर्त्यांची गरज आहे. कार्यकर्त्यांनी आपल्या वेगवेगळ्या कौशल्याप्रमाणे या कार्यात आपले योगदान दिले पाहिजे. आपले हे कार्य अधिक जोमाने चालू आहे. त्यामुळे सद्गुरू समाधानी आहेत हे मी तुम्हाला नक्की सांगू शकतो.






पावसच्या एका व्यक्तीने आमच्याकडे खंत व्यक्त केली ती म्हणजे स्वामी स्वरूपानंदांचे कार्य पुढे गेलेच नाही. त्यांचे तिथले व्यवस्थापन खूप छान आहे पण कार्य पुढे गेले नाही. ते म्हणाले की, सद्गुरूंनी जीवनविद्येचे ज्ञान पिढ्यानपिढ्या पुढे जावे. यासाठी जी व्यवस्था केली ती अप्रतिम आहे. आपली कार्य पुढे नेण्याची व्यवस्था त्यांना खूप आवडली. सद्गुरूंचे हे कार्य असेच पुढे जाण्यासाठी तरुणांनी मोठ्या प्रमाणावर सहभागी व्हायला पाहिजे. जीवनविद्येकडे तरुण मोठ्या प्रमाणावर आकर्षित होत आहेत. हे कार्य तरुणांच्या हाती सोपवावे असे मलाही वाटते. त्यासाठी अधिकाधिक तरुणांनी कार्यात भाग घ्यावा. त्याचबरोबर मी असेही सांगेन की, कार्यासोबत अभ्यास आणि साधनाही करायची. अभ्यास केला नाही तर उत्कर्ष होत नाही आणि साधना केली नाही तर आपली उन्नती होत नाही. त्यासाठी आपल्याला जीवनविद्या समजली पाहिजे. ग्रंथदिंडी करत असताना आपण जो ग्रंथ वाचलेला असतो त्यावर प्रभावीपणे बोलू शकतो. सद्गुरूंना नुसत्या कार्याची अपेक्षा नाही तर आपला प्रत्येक नामधारक टॉपला जावा ही इच्छा आहे. टॉपला गेलेल्या व्यक्तींना आपण अभ्यास आणि साधना करत घरी बसावे असे वाटते हेही बरोबर नाही. आपल्याला सर्वांचा बॅलन्स सांभाळला पाहिजे. सद्गुरूंनी जसे प्रापंचिक आणि परमार्थिक जीवनाचा बॅलन्स सांभाळत सामाजिक ऋण फेडण्याचा जो प्रयत्न केला तसा तो आपणही सर्वांनी केला पाहिजे. माझी अशी






इच्छा आहे की आपल्यापैकी प्रत्येकाने जे काही योगदान देता येईल त्यासाठी पुढे आले पाहिजे. आम्ही रत्न शोधत असतो पण प्रत्येकाकडे आमचे लक्ष जाईलच असे नाही. त्यांच्याकडे काही स्किल नसेल पण सेवाभाव वृत्ती आहे ते कर्जतला येऊन सेवा देतात. एखादे काम तुम्ही घरी करत नसाल तर तेच काम तुम्ही तिथे जाऊन केलेल्या सेवेने तुम्हाला खरा आनंद मिळेल.

सद्गुरूंनी माईंच्या सेवाभावाबद्दल नेहमीच सांगितले तो सेवाभाव आपणही जगू या. माईंनी सद्गुरूंच्या कार्यात जी मदत केली त्याचे मोजमाप आपण करीत असलेल्या कार्याशी करता येणार नाही. हे लक्षात ठेवायचे आपले कार्य आणि सद्गुरूंचे कार्य यात खूप अंतर आहे. कार्य हे केवळ कॉलिटीने महान नाही तर कॉन्टिटीने सुद्धा महान आहे. अशा महान कार्यात माईंनी जशी सद्गुरूंना साथ दिली तशी आपणही आपल्या पार्टनरला साथ द्यावी. त्यांना कार्यासाठी वेळ द्यावा आणि स्वतःही त्या कार्यात भाग घ्यावा. त्यासोबत अभ्यासही करावा पुन्हा पुन्हा एक गोष्ट सांगतो की, अभ्यास आणि साधना केली नाही तर तुमचा उत्कर्ष उन्नती होणार नाही. कार्यात येऊनही उत्कर्ष उन्नती झाली नाही तर यालाही अर्थ नाही. जीवनविद्येने

जी तत्वे सांगितली आहे ती थोडी जरी आचरणात आणली तरी तुम्ही टॉपला जाल एवढे सातत्यात सामर्थ्य आहे. त्यासाठी कार्याच्या जोडीला अभ्यास आणि साधना करूया. आपले कार्य जगभरात खूप जोरदार चाललेले आहे. अमेरिका, ऑस्ट्रेलिया या ठिकाणची खूप लोक आपल्याला जोडली गेलेली आहेत. तिथल्या डलास या राज्यामध्ये गार्गी सुखटणकर शाळांमध्ये मार्गदर्शन करून तिथल्या शिक्षकांमार्फत जीवनविद्या विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवलेली आहे. अमेरिकन टीचर्सना आपण मार्गदर्शन करीत आहोत. प्रत्येकाने आपल्या जगात जीवनविद्या पोहोचवण्याचा प्रयत्न केला तर जीवनविद्या संपूर्ण जगात जाणार आहे. जुन्या नामधारकांनी खूप कार्य केले तेव्हा ते इथपर्यंत आलेले आहे. आता इथून पुढे हे कार्य नेण्यासाठी तरुणांनी आपले योगदान दिले पाहिजे. आपले तत्वज्ञान हे अत्यंत निखळ आणि उच्च प्रतीचे आहे. ते लोकांपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी आता आपली आहे. आम्हाला कार्यासाठी वेळ नाही असे सांगितले





जाते. तुम्हाला वेळ का मिळत नाही तुम्ही दिवसभर बिझी का असतात याचे उत्तर आहे. तुम्ही कार्य करीत नाहीत म्हणून तुम्हाला वेळ मिळत नाही. पण तुम्ही जर कार्य केले तर तुमची व्यवस्था होणार. तुम्ही लोकांपर्यंत कार्य पोहोचविण्यासाठी व्यवस्था जेवढी कराल तेवढी तुमची व्यवस्था सगळीकडे होईल हे लक्षात ठेवायचे. तुम्ही जेव्हा हे कार्य करता तेव्हा तुमची ऑफिसमध्ये, घरामध्ये आपोआप व्यवस्था होऊ लागते, सहकार्य मिळू लागते. तुम्ही हे करून बघा, कार्यासाठी तुम्ही पुढे या, सद्‌गुरू तुमच्या सोबत येणारच आहेत. सद्‌गुरू कार्य केल्याने ऑफिसमध्ये सहकार्य मिळेल. घरातले वातावरण चांगले होईल आतापर्यंत ज्या ज्या कार्यकर्त्यांनी कार्य केले ते सर्वच महान आहेत. त्यांच्यामुळे हे महान कार्य इथपर्यंत पोहोचलेले आहे आणि आता इथून पुढे ते अधिक जोमाने व्हायला हवे.

**माई महोत्सव २०१८**



# आमच्या माई

प्रत्येक यशस्वी पुरुषाच्यामागे त्याला यश मिळवून देण्यात त्याच्या पत्नीचा हातभार असतो असे दिसून येते. सद्गुरू पै महाराज यांच्या यशात सौ. माईंनी नुसता हातभार लावला नाही. तर तन, मन, धन सर्व शक्तींनिशी माईंनी त्यांच्या कार्यात स्वतः ला वाहून घेतलं. दोघांनी मिळून आपल्या संसाराच्या सुखी कळीतून सहज परमार्थ फुलविला. इतकेच नव्हे तर अनेक जणांचे संसार सुखाने दरवळून टाकले. आदर्श गृहस्थाश्रम कसा असावा याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणून माई - महाराज यांच्या संसाराकडे बोट दाखवता येईल.

सद्गुरूंच्या पत्नी सौ. नलिनी आम्हा सर्वांच्या सौ. माई म्हणजे सद्गुरूंच्या मागची अतुल शक्ती आहे. "तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार" या सद्गुरूंच्या ग्रंथात जी समर्पण पत्रिका आहे ती म्हणजे माईंना लाभलेले एक अनमोल 'मानपत्र' होय. यात म्हटले आहे.

" पति हाच देव या भावनेने जी मला सतत साथ देत आहे व जिने प्रपंचाचा मोठा भार समर्थपणे पेलून जीवनविद्येचा प्रचार व प्रसार करण्याची संधी मला उपलब्ध करून दिली, त्या माझ्या प्रेमळ पत्नीस सद्गुरू कृपेने साकार झालेले हे ग्रंथ पुष्प सप्रेम समर्पण "

- सद्गुरू चरणरज वामनराव ग. पै



या शब्दात सद्गुरूंनी केलेला गौरव म्हणजे माईंचा सर्वोच्च असा बहुमान आहे. ही काही सामान्य पतीने केलेली स्तुती नाही, तर आत्मज्ञानी, दिव्य सतपुरुषाने आपल्या जीवन सहचारिणीचे केलेले मूल्यमापन आहे! ज्यामुळे सौ माईंबदल नितांत आदर आणि प्रेम बाळगणाऱ्या आम्हा सर्व साधक भगिनींचा उर आनंदाने व अभिमानाने भरून न आला तरच नवल ठरेल !!

सौ. माईंचे सदा हसतमुख व सतेज व्यक्तीमत्त्व पाहताच जाणीव होते ती सद्गुरूंच्या दिव्यप्रभेची. माईंची दिनचर्या पाहताना मला अष्टभुजा देवीचे दर्शन घडते. संसार व परमार्थ यांचा समतोल साधताना अष्टवधान कस राहावं हे माईंकडून शिकाव! कुटुंबासाठी निरनिराळ्या प्रकारचा स्वादिष्ट स्वयंपाक बनविणे, त्यांना प्रेमाने वाढणे, नातवाची तयारी करून शाळेत सोडणे, घराची व्यवस्था, साफसफाई पाहणे, आल्यागेल्या पाहुण्यांचे आदरातिथ्य करणे ही घरातील रोजची कामे करून माई सद्गुरूंच्या प्रवचन, कीर्तनादी कार्यक्रमास उत्सहाने सहभाग घेत. वरील सर्व कामे कोणत्याही प्रकारचा गाजावाजा न करता झटपट उरकून मोकळे होणे हे त्यांचे वैशिष्ट्य! म्हणूनच त्यांचे भावोजी माईंच्या कामाचा झपाटा पाहून गमतीने त्यांना 'प्रेशर कुकर' म्हणत. अशा रीतीने माई प्रपंच व परमार्थ यांचा मेळ घालीत असताना 'साधना' केव्हा करतात? असा प्रश्न मला पडला तेव्हा त्यांनी सहजपणे हसत उत्तर दिले, "अग ! हे सर्व हाताने करीत असताना मनातून हरिपाठ म्हणते व नामस्मरण करते." माईंचे हे उत्तर ऐकून 'मला साधना करायला वेळ मिळत नाही' ही सबब आपण हद्दपार केली पाहिजे हा साक्षात्कार मला झाला

या संदर्भात एकदा एका बाईंनी सौ. माईंना विचारले, "घरातली सर्व काम करून तुम्हाला

महाराजांच्या कार्यक्रमांना यायला जमते कसे?" त्यावर माईंनी उत्तर दिले, " अहो, ते जमत नाही. जमवावे लागते." मला वाटते माईंच्या या उत्तरातच त्यांच्या यशस्वीपणाची गुरुकिल्ली आहे.

आमच्या माईंचे बालपण गोव्यात गेले. सद्गुरूंची आई व माईंची आई या दोघी बालमैत्रिणी! त्यामुळे सद्गुरूंच्या कुटुंबाशी माई आपल्या सुस्वभावाने लहानपणापासूनच परिचित होत्या. सद्गुरूंच्या आईंना माई सून म्हणून पसंत होत्या व ही मुलगीच आपली सहधर्मचारिणी होण्यास अत्यंत योग्य आहे हे जाणून सद्गुरूंनी विवाहस होकार दिला.

माई प्रथमपासूनच स्वभावाने पतिपरायण असल्यामुळे त्यांनी पतीच्या सांसारिक व पारमार्थिक जीवनात आनंदाणे सहभाग घेतला. सद्गुरूंचे सद्गुरू प. पू. नानामहाराज श्रीगोंदेकर यांच्या पवित्र दर्शनाचा लाभ त्यांनी वेळोवेळी घेतला. घरात एकत्र कुटुंब मुक्कामास येणारे पाहुणे, दोन लहान मुले, बाजारहाटापासून स्वयंपाकघरातील कामे हे एकटीने समर्थपणे सांभाळून त्यांनी आपल्या पतीस आध्यात्मसाधना, प्रवचनादी कार्यक्रम, पुस्तकांचे लिखाण करण्यास वेळ दिला, स्फुर्ती दिली. म्हणूनच माई म्हणजे सद्गुरूंची प्रेरणाशक्ती आहेत



मुले मोठी झाल्यावर त्यांनी सद्गुरूंच्या कार्यक्रमात प्रत्यक्ष भाग घेण्यास सुरवात केली. त्यांचा सहभाग हा वरवरचा नाही. सद्गुरूंच्या सर्व शिष्य वर्गाबद्दल त्यांच्या मनात अपार प्रेम! त्यांच्या घरगुती गोष्टींबद्दल त्या आपुलकीने विचारणा करत, मुलाबाळांचे कौतुक करत व प्रसंगी योग्य अनुभवी सल्ला देत. म्हणूनच सद्गुरूंच्या कार्यक्रमानंतर विठ्ठला बरोबर या पावन रखुमाईचे दर्शन घेण्यास साधक आवर्जून त्यांच्या अवतीभोवती गोळा होत. काही अडचणींमुळे त्या येऊ शकल्या नाहीत तर त्यांची अनुपस्थित प्रकर्षाने जाणवते.

सद्गुरूंचे समाजप्रबोधन व अंधश्रद्धा निर्मूलन कार्य चालू असताना. माईंनी स्वतः निर्भयपणे अंधश्रद्धा मोडून लोकांना आदर्श घालून दिला आहे. तो असा प्रसंग घडला एकदा चिंचणी येथे श्री सद्गुरूंचे प्रवचन होते. प्रवचन झाल्यावर तेथील काही साधक व्यक्तींनी महाराजांना आपल्या घरी आग्रहाणे चहा - फराळासाठी नेले. सद्गुरूंचे पाय आपल्या घराला लागावे या इच्छेने एका स्त्रीने सद्गुरू व माईंना मोठया प्रेमाने आपल्या घरी नेले. तिला सद्गुरूंना ओवाळण्याची व माईंची ओटी भरण्याची इच्छा होती. परंतु दुर्दैवाने ती स्त्री व तिची सून दोघी विधवा असल्यामुळे दुसऱ्या कोण्या सुवासिनीला बोलविण्यासाठी तिने निरोप पाठविला. तेव्हा महाराजांनी विचारले, "ओटी भरण्यासाठी खरोखर कोणाला इच्छा आहे? तुम्हाला ना? मग तुम्हीच माईंची ओटी भरा ना." तिची सुनबाई प्रथम तयार होईना. परंतु सौ. माईंनी आग्रहच धरला व त्या स्त्री कडून ओटी भरून घेतली इतकेच नव्हे तर स्वतःच्या हाताने तिला कुंकुमतिलक लावला. खरोखर धन्य आमच्या माई! भावाचे बंधन तोडणाऱ्या सद्गुरूंनी अंधश्रद्धेचे बंधन तडकन तोडवे यात

आश्चर्य नाही. परंतु माईंनी त्या स्त्रीच्या हृदयातील सद्गुरूभाव ओळखून त्या भावाचे मोल जाणले. म्हणूनच धैर्याने त्यांनी अंधश्रद्धा गाडून आत्मश्रद्धेने उन्नयन केले. त्यावेळी त्या माऊलींच्या डोळ्यात जे कृतार्थतेचे आनंदअश्रू उभे राहिले, तेच माईंच्या दिव्यात्वाची साक्ष देतात.

सद्गुरूंच्या प्रवचनातून बऱ्याच वेळा याज्ञवल्क्य व त्यांच्या तत्वज्ञानाचा उल्लेख येतो. याज्ञवल्क्य या आत्मज्ञानी सतपुरुषाच्या दोन बायका असतात. त्यापैकी एका पत्नीचे नाव मैत्रेयी हिला अध्यात्माची विशेष आवड असते व दुसरी पत्नी कात्यायानी. ही संसार व मुले बाळे यातच रमलेली असते. मला आमच्या माईंमध्ये या दोघीतील चांगल्या गुणांचा समन्वय झालेला आढळतो. माईंनी सद्गुरूंचे शिष्यत्व पत्करून जीवनविद्या साध्य केलीच, परंतु कधीही घरादाराकडे घरातील माणसांकडे दुर्लक्ष केले



नाही. पतीचे ध्येय तेच आपले ध्येय मानणाऱ्या व त्यांचे अंतरंग पूर्ण जाणणाऱ्या माई खऱ्या अर्थाने सद्गुरूंच्या अर्धांगिनी आहेत. याचा प्रत्यय आम्हा साधकांना वेळोवेळी येतो. सद्गुरूंना कोणती वस्तू हवी असेल, स्वेटर, मफलर, टोपी, चष्मा काहीही, ती वस्तू माईंच्या पिशवीत हजर असते. कोणते कार्यक्रम कधी आहेत, कोणत्या समारंभास जायचे आहे, कोण कधी घरी येणार आहेत, हे माईंना माहित असते, तर महाराजांना कधी कोणत्या गोष्टींची आठवण करायची हे माईंच्या बरोबर लक्षात असते. म्हणून सद्गुरू एकदा म्हणाले होते, "मला काही हवे असेल तर माईंना सांगावे लागत नाही, त्यांना आपोआप कळते," कारण या हृदयाचे त्या हृदयी जाण्यासाठी आवश्यक असणारी संपूर्ण शरणागती त्यांचे ठायी आहे.

अशा 'माऊलीहुनी मायवंत' असणाऱ्या माई एक आदर्श गृहिणी, उत्तम साधक व प्रभावी मार्गदर्शक म्हणून आमच्या समोर आहेत. आज माई व महाराज आपला प्रेमळ मुलगा, सुनबाई, मुलगी, जावई व गोड नातवंडे यांच्यासमवेत ऐश्वर्यपूर्ण व समृद्ध संसारात कृथार्थतेचे जीवन अनुभवीत आहेत. माई व महाराज यांना उदंड आयुष्य, आरोग्य व स्वास्थ्य लाभावे, ही परमेश्वरा जवळ अंतःकरणापासून प्रार्थना!

**लेखिका : सौ. शिल्पा आशादिप ढगे**
(दीपस्तंभ एप्रिल १९९८ मधून पुनर्प्रकाशित)



# स्त्री सन्मान अभियान

स्त्रीचा आत्मसन्मान जागृत करून सर्वांनी स्त्रीचा सन्मान करावा यासाठी जनजागृती करत आहोत.
या उपक्रमांतर्गत महिलांना मुख्य प्रवाहात आणले जात आहे.
१) बेटी बचाव, २) बेटी पढाव, ३) विधवांना वेगळी वागणूक न देणे
२०१६ पासून. महाराष्ट्र. दोन कार्यशाळा.

# जाणे माऊलीचे चित्त..

'आई' झालेल्या हसतमुख आणि हव्याहव्याशा वाटणा-या 'माई' आईचे विश्वात्मक श्रेष्ठत्व स्पष्ट करण्यासाठी संतश्रेष्ठ तुकाराम महाराज सांगतात,

'लेकुराचे हित, जाणे माऊलीचे चित्त |
ऐसी कळवळ्याची जाती, करी लाभाविण प्रीती ||'

जोपर्यंत आईचा सहवास लाभतो तोपर्यंत प्रत्येक मुलाला मग ते कितीही मोठं असलं तरी त्याला स्वत:ला आपण लहान असल्याची एक सुखद भावना असते. खरं तर कुटुंबातील सर्वच जण आपले असतात. पण, त्यातही आपली अत्यंत प्रिय अशी एक व्यक्ती असते. तिच्याशिवाय आपलं मुळीच करमेना अशी एक जीवाभावाची व्यक्ती असते आणि ती व्यक्ती म्हणजे आई.

हे मी यासाठी सांगत आहे की जीवनविद्या मिशन (पूर्वाश्रमीचं नामसंप्रदाय मंडळ) हे एक असं कुटुंब आहे की या कुटुंबातील सद्‌गुरू श्री वामनराव पै माऊलींच्या धर्मपत्नी सौ. शारदामाई या आम्हां सर्व नामधारकांच्या 'माई' बनून 'आई' झाल्या होत्या. इतकंच नव्हे तर ज्यांना ज्यांना म्हणून त्यांचा सहवास लाभला त्यांना त्यांना त्या 'मातृतुल्य माई' म्हणूनच जाणवत होत्या. आईचे प्रेम, वात्सल्य त्यांच्या डोळ्यांतून नेहमीच पाझरत होते आणि म्हणूनच माईबद्दल बोलत असताना आपोआपच 'मातृतुल्य माई' म्हणूनच त्यांचं वर्णन केलं जात असावं.

मला आठवतो तो प्रसंग. १९८८ साली माझं लग्न झालं त्यावेळी सद्‌गुरू श्री पै माऊली आणि सौ. माई दादरला 'कृष्णकमल' इमारतीत रहात होते. सद्‌गुरूंनी आम्हा उभयतांना केळवणासाठी आपल्या घरी बोलावून घेतले होते. आम्ही जोगेश्वरीला रहात असल्याने दादरला येताना ट्रेनने प्रवास करावा लागणार होता. माईंनी सांगितले की ट्रेन प्रवास करताना दागिने घालून प्रवास करू नको. संसारी असावे सावध.' माईंनी सांगितल्याप्रमाणे प्रवास करून आम्ही सद्‌गुरूंच्या घरी गेलो. घरी आल्यावर माईंनी आणि सद्‌गुरूंनी आमचे हसतमुखाने स्वागत केले. आम्हा उभयतांना त्यांच्या बेडवर बसवलं. माई किचनमध्ये गेल्या आणि येताना मात्र एका स्वच्छ परातीत विविध रंगातील खोब-याच्या वड्या घेऊन त्या आमच्या हातात प्रेमाचा कटाक्ष टाकत मला हसतमुखाने दिल्या. त्यावेळी सद्‌गुरू म्हणाले 'या खास खोब-याच्या वड्या माईने तुझ्यासाठी बनवल्या आहेत नर!' जीवनविद्या मिशन या कुटुंबात येऊन मला खरंतर एक वर्षही झालं नव्हतं. पण, केवढं ते सद्‌गुरू माईंचं प्रेम की आम्हा उभयतांना त्यांनी आपल्या घरी बोलवावं. इतकंच नव्हे तर खास मला आवडतात म्हणून वेगवेगळ्या रंगांमध्ये खोब-याच्या वड्या बनवाव्यात! मला वाटतं विविध रंगातील खोब-याच्या वड्या हे आमच्यासाठी निमित्त होतं. खरंतर आम्हा उभयतांसाठी त्यांना आम्हाला बोध द्यायचा होता की विविध रंगाने नटलेल्या या जीवनात तुमचा संसारही तुम्ही गोड करावा.

आता दुसरा प्रसंग आठवतो. १९ नोव्हेंबर २००२ हा तो दिवस. यावेळी मात्र सद्‌गुरू आणि सौ. माई दादर सोडून बोरिवली येथील 'प्रभू स्मरण' या बंगल्यात रहायला आले होते. आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवरील "चिंतन हा चिंतामणी" या ऐतिहासिक कार्यक्रमाचे लिखाण करावे म्हणून सद्‌गुरूंनी मला या बंगल्यावर बोलावून घेतले होते. बंगल्याच्या प्रवेशद्वारामधून मी आत आलो हे सद्‌गुरूंनी त्यांच्या पहिल्या मजल्यावरील बेडरूममधून मला पाहिले आणि तिथूनच माईंना उद्देशून 'अगं नले, आपला नर आलाय. आता कामं आटपते घेतो सगळी...' बंगल्याच्या आत

गेल्यावर सद्‌गुरूंनी मला आपल्या बेडरूममध्ये बोलावून घेतले आणि नेमका त्याचवेळी कोणाचा तरी त्यांना फोन आला. सद्‌गुरूंनी फोन उचलला आणि दहा मिनिटे तरी ते त्या व्यक्तीशी बोलत होते. समोरच असलेल्या माईंनी हे पाहिले आणि माई सद्गुरुंना म्हणाल्या ‘अरे तो नर आलाय, त्याच्याकडून लिहून घे आधी. लिहून झाल्याशिवाय आता कोणाचाही फोन घेऊ नको. आलेच कोणाचे फोन तर ते मी घेते’ सद्‌गुरू समजले. माईंकडे पाहिले, हसले. तो फोन त्यांनी ठेवला आणि तिथूनच ‘चिंतन हा चिंतामणी’ या ऐतिहासिक कार्यक्रमाच्या लिखाणाकरीता सद् गुरूंच्या मार्गदर्शनाची सुरुवात झाली.

तेव्हा अशा या आमच्या माई. जेवढं प्रेम त्या आपल्या कुटुंबावर आणि नामधारकांवर करीत होत्या, तेवढंच किंबहुना कांकणभर अधिक प्रेम सद्‌गुरू करीत असलेल्या कार्यावर करीत होत्या. सद्‌गुरूंच्या सुखी संसारिक जीवनात आणि परमार्थीक जीवनात 'माई' या सावलीप्रमाणे होत्या. वास्तविक पाहता संसाराचा डोलारा सहनशील राहून तो कौशल्याने कसा हाताळावा, शहाणपणाने आणि सदा हसतमुख राहून तो कसा सांभाळावा, संसार सुखाचा करायचा असतो, तो आपोआप होत नसतो, हे माईंकडे पाहिल्यावर आपल्या प्रत्येकाच्या ध्यानात यायला हवे. अर्थात ज्यांनी ज्यांनी हे ध्यानात घेऊन संसार सुखाचा करण्याचा प्रयत्न केला ते खरोखर धन्य होत. अशा या आम्हा सर्व नामधारकांच्या प्रेमळ माईंचे २५ फेब्रुवारी २०२३ रोजी वयाच्या ९७ व्या वर्षी वृध्दापकाळाने महानिर्वाण झाले. सद्‌गुरूंचे महानिर्वाण झाल्यावर जी पोकळी निर्माण झाली होती. ती भरून काढणे अत्यंत कठीण होती. माईंनी त्यानंतर ११ वर्षे आपणा सर्वांसाठी राहून सद्‌गुरूंच्या शतक महोत्सवी वर्षांत आपला देह अखेर सद्‌गुरू चरणी अर्पण केला. सद्‌गुरू माईंचे असणे आमच्यासाठी सर्वकाही होते. आमच्या आयुष्यातील ते एक सुंदर पर्व होते. त्यांच्या मार्गदर्शनाने मार्गक्रमण केल्याने आज आमच्याकडे सर्वकाही असल्याची आम्हाला जाणीव आहे, पण त्यांचे नसणे ही मात्र आमच्यासाठी फार मोठी उणीव आहे.

सर्वांना हवेहवेसे वाटणारे आणि सर्वांशी हसत खेळत राहणारे 'माई’ हे व्यक्तिमत्त्व आपल्यामधून देहाने निघून गेले. खरे तर पै कुटुंबियांवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. आम्ही सर्वजण त्यांच्या दु:खात सहभागी आहोत. पै कुटुंबियांना या दु:खातून सावरण्यासाठी परमेश्वर बळ देवो अशी प्रार्थना करतो आणि सर्वांशी हसतमुख राहणा-या व सर्वांना हव्याहव्याशा वाटणा-या माईंच्या चरणी नतमस्तक होतो. समस्त नर कुटुंबियांच्या वतीने त्यांना कृतज्ञतापूर्वक आदरांजली वाहतो.

**जनार्दन नर,** मिरारोड
९८२०२ ७०४१२



# विद्यार्थी मार्गदर्शन अभियान

या संवादामधुन आपणास काय मिळेल.

- अभ्यासाच्या पद्धती व अभ्यासाचे महत्त्व
- राष्ट्रभक्ती व राष्ट्रप्रेम
- शरीराचे महत्त्व
- चांगली संगती व व्यसनापासून अलिप्त
- निसर्गनियमांचे जीवनातील महत्त्व

आपल्या शाळेचा फक्त एक तास आम्हाला द्या. संपर्क : श्री. दिलीप निर्मल ९८७०३१०१३७

# तेजोवलयांकीता शारदा..

महाराष्ट्राचे थोर विचारवंत, राष्ट्रभक्त, आत्मज्ञानी सद्गुरू श्री वामनराव पै ह्यांच्या धर्मपत्नी म्हणजे सौ. शारदा वामनराव पै. सौ. शारदामाईंचे २५ जानेवारी २०२३ या दिवशी महानिर्वाण झाले आणि सद्गुरूंचा सर्व शिष्य वर्ग जणू स्तब्ध झाला.

श्री सद्गुरूंनी निर्माण केलेल्या जीवनविद्या तत्त्वज्ञानाबद्दल एका शब्दात सांगायचे तर जीवनविद्या म्हणजे फक्त 'शहाणपण'. माणसाकडे जर केवळ एक शहाणपण असेल तर ब्रम्हदेव जरी खाली आला तरी तो माणसाला दुःखी करू शकणार नाही असा त्यांचा सिद्धांतच आहे. शहाणपणाचे मूर्तिमंत प्रतिक म्हणजे स्वतः श्री सद्गुरू ! आपली धर्मपत्नी कशी असावी याचा त्यांनी विचार करून ठेवला होता. त्यात फिट्ट बसणारी 'नलीनी' त्यांना गोव्यात सापडली.



आरखून-पारखून घेत श्री सद्गुरूंनी त्यांना मागणीच घातली आणि तिचे नाव ठेवले 'शारदा'. पत्रोपत्री श्री सद्गुरूंचे नाव आहे मोरेश्वर. या मोरेश्वराची "शारदा" बनून नलीनी पै कुटूंबात सामील झाली.

हळू हळू स्वतःच्या सालस, गुणी स्वभावामुळे ती सद्गुरूंच्या सर्व शिष्य मंडळींची 'माई' झाली. आणि सौ. शारदामाई सद्गुरूंची शिष्या बनून त्यांची सखी, स्फूर्तिदेवता झाली. अशा या सौ. माईंचे स्त्री जातीवर अनंत उपकार आहेत. कारण माईंच्या वागण्यावरून, आचरणावरुन श्री सद् गुरूंना 'स्त्री' कशी असावी याबद्दल अनेक सिद्धांत स्फुरले आहेत.

सद्गुरूंच्या प्रत्येक प्रवचनामधे 'माई आपली वैष्णोदेवी आहे' असा उल्लेख असायचा. सहनशक्ती हीच खरी भक्ती आहे असे सांगताना श्री सद्गुरू माईंकडे बोट करुन सांगायचे, "आमची माई म्हणजे साक्षात सहनशक्तीची परीसीमा आहे." स्वतः माईसुद्धा एका मुलाखतीत म्हणाल्या, "मी मुळातच समजुतदार होते, सहनशक्ती माझ्याकडे असल्याने मी कुठल्याच गोष्टींचा कधी बाऊ नाही केला. कधीच कशाबद्दल मी सद्गुरूंकडे तक्रार नाही केली किंवा कुठल्या गोष्टींचा आग्रह नाही धरला, हट्ट नाही केला. मी समाधानी होते."

श्री सद्गुरूंचे शारदामाईंवर नितांत, निस्सीम प्रेम होते. जाहीर बोलताना सुद्धा ते व्यक्त होत



थोर समाजसुधारक, तत्वज्ञ सद्गुरु श्री. वामनराव पै

उजळती ज्ञानाच्या ज्योती, वेचिता जीवनविद्येचे संस्कारमोती
श्री प्रल्हाद वामनराव पै लिखित आगामी पुस्तक
"जीवनविद्येचे १०८ संस्कारमोती"


श्री. प्रल्हाद वामनराव पै
B.TECH(IIT, POWAI) MAM, TOM(JAPAN)



होते. कारण माई आमच्या गुणसुंदरी, रूपसुंदरी, खूप हुशार वगैरे शब्दाने माईंचे कौतुक करायला श्री सद्‌गुरू कधी विसरायचे नाहीत.

"स्त्री जर स्त्रीवर प्रेम करेल, आदर करेल आणि एकमेकींचा सन्मान करेल तर त्या घराचा 'स्वर्ग' व्हायला वेळ लागणार नाही" हा सिद्धांत सद्‌गुरूंनी मांडला. स्वतः माईंनी आपल्या घरातील मुलगी सौ. मालन, सून सौ. मीलन व नातसून सौ. प्रिया यांच्यावर आणि तमाम शिष्य वर्गातील स्त्रियांवर कसलीही अपेक्षा, आग्रह न ठेवता निस्सीम प्रेम करून सद्‌गुरूंचा हा सिद्धांत खरा ठरविला.

साधकांना माई नेहमी हसत असतानाच दिसायच्या. कष्ट, कर्तव्य, कौशल्य, कल्पकता, कौतुक, करुणा, कृतज्ञता या गुणांचे मूर्तिमंत प्रतिक म्हणजे आपल्या सौ. शारदामाई होत्या. त्यांच्या घरात आलेली प्रत्येक व्यक्ती कधीच विन्मुख गेली नाही. ओळख असो वा नसो प्रथम त्या हसायच्या व 'या' असं प्रेमाने म्हणायच्या. (हा तर स्वतः माझाच, मी घेतलला अनुभव आहे.) त्यांच्या हास्याने सर्व शीणच निघून जायचा.

खरे तर सद्‌गुरूंनी माईंवर जास्त प्रेम केले की माईंनी सद्‌गुरूंवर जास्त प्रेम केले हे सांगणे आणि ओळखणे देखील कठीणच. ते दोघे शरीराने दोन होते पण मनाने एकरुप झालेले होते. कधी कधी ते दोघे जण 'हा', 'हा', 'ही' ची भाषा बोलायचे, म्हणजे त्यांचे संभाषण व्हायचे. माई म्हणायच्या तो 'हा' आला होता, ह्याने 'हे' आणलं होतं. त्यावर सद्‌गुरू उत्तर द्यायचे "हो का? मग काय म्हणाला तो? त्याने काय आणलं?" म्हणजे त्यांना बरोबर कळायचं 'हा' म्हणजे कोण ते. त्यावेळी त्यांची एकरुपता दिसून यायची.

थोडक्यात सद्‌गुरुरुपी संतश्रेष्ठाच्या त्या भार्या होत्या. संपूर्ण स्त्री जातीच्या 'आदर्श' होत्या, तेजोवलयांकीता शारदा होत्या. त्यांचे वर्णन करावयास शब्द अपूरे पडतात. त्यांच्यात असलेल्या एका गुणाची तरी आपण जोपासना केली तरी आपला संसार सुखाचा होईल यात शंकाच नाही. आणि हीच माईंना आदरांजली असेल.

**सौ शितल गोरे,** चारकोप
९१६७७५५२१९



घन कचरा निर्मूलन

2018 पासून महाराष्ट्र एकूण पाच कार्यशाळा कंपोस्ट खत गांडूळ खत तयार करण्यास उद्युक्त करणे ओला सुका कचरा विलगीकरण ओला कचरा वेगळा करून त्यातून सेंद्रिय खत निर्मिती करण्याचे मार्गदर्शन केले जाते ई-कचरा विलगीकरण प्लास्टिक विलगीकरण प्लास्टिकला पर्याय सुचविणे व पर्यावरण हानीसंबंधी जागरूकता निर्माण करणे पर्यावरण पूरक वस्तू वापरण्याबद्दल मार्गदर्शन व प्रदर्शने भरविणे 2021 सांगली महाराष्ट्र एकूण सहा कार्यशाळा

# नाथांची गिरीजा आणि सदगुरूंची माई

संत भानुदासांच्या कुळात, अत्यंत सधन आणि सुसंस्कारित कुटुंबात संत एकनाथ यांचा जन्म झाला. अगदी लहान असताना यांच्या आईवडिलांचे निधन झाले. आजीआजोबांनी त्यांचा सांभाळ केला. लहानपणापासून भक्तिमार्गाचे संस्कार असलेल्या एकनाथाने गुरुप्राप्तीसाठी वयाच्या बाराव्या वर्षी आजीआजोबांना न सांगता पैठणहून देवगिरीस प्रयाण केले. तेथे जनार्दन स्वामींचे शिष्यत्त्व पत्करले. गुरूंच्या सहवासात त्यांनी अनेक वर्षे कठोर साधना केली. अखंड गुरुसेवा केली. तीर्थयात्रेच्या निमित्ताने देशाटन केले. इकडे पैठणला नातवाच्या अचानक जाण्याने आजीआजोबा चिंतेत होते. काही वर्षांनी आजी आजोबांना आपला एकनाथ देवगिरीवर जनार्दन स्वामींपाशी आहे, असे समजताच एका पुराणिक बुवांच्या माध्यमातून त्यांनी जनार्दन स्वामींना निरोप दिला. आपल्या म्हातारपणीची काठी असलेल्या एकनाथाला स्वगृही पाठवून गृहस्थाश्रम स्वीकारण्याची आज्ञा करावी अशी विनंती त्यांनी जनार्दन स्वामींना केली. ती विनंती मान्य करून जनार्दन स्वामींनी तीर्थयात्रेस गेलेल्या एकनाथांना त्यानुसार लिखित आदेश दिला. व तीर्थयात्रेहून परत येताना थेट पैठणला स्थिर होण्यास सांगितले. गुरूंच्या आदेशाचे पालन करून नंतर एकनाथांनी गृहस्थधर्म स्वीकारला. सुसंस्कारी गिरीजाशी त्यांचा विवाह झाला.

संत एकनाथांनी आपल्या जीवनात प्रपंच आणि परमार्थ यांचा सुरेल संगम साधला. जनता जनार्दनाबद्दल अंतरीचा कळवळा असणाऱ्या नाथांचे घर दीन दुबळ्यांसाठी एक अन्नछत्रच होते. रात्री राहत्या वाड्यात नाथांचे कीर्तन ऐकायला शेकडो लोक दुरुनदुरून येत असत. त्या सर्वांची व्यवस्था राखण्याचे, त्यांना खाऊपिऊ घालण्याचे काम नाथांची पत्नी गिरीजा अगदी आनंदाने करीत असे. चारशे वर्षापूर्वीचा काळ. त्याकाळातील सर्वसामान्य सनातन कुटुंबातील स्त्री कर्मकांडांच्या किंवा जातीपातीच्या बंधनात अडकलेली असणे कोणीही स्वाभाविक मानेल. पण हे नाथांच्या गिरीजेच्या बाबतीत मात्र हे घडले नाही. पतीधर्म हाच तिचा धर्म होता. नाथांनी जनताजनार्दनाची सेवा केली. ज्ञानदान करीत समाजसुधारणेचे व्रत त्यांनी स्वीकारले. त्यानुसार त्यांना साथ देत गिरीजा तिचे संपूर्ण आयुष्य जगली. अनिष्ट रूढी-परंपरांच्या विरुद्ध जाऊन समाजाला योग्य दिशा दाखविण्याचा प्रयत्न करताना नाथांना आप्तेष्टांच्या व सनातनी लोकांच्या रोषाला सामोरे जावे लागले. त्या प्रत्येक प्रसंगी त्यांची पत्नी गिरीजा त्यांच्या पाठीशी ठाम उभी होती. ती त्यांची शक्ती होती. ती त्यांचे बलस्थान होती.

सद्‌गुरू श्री वामनराव पै आपल्या प्रवचनात संत एकनाथ यांची अनेक वचने आणि काही गोष्टी नेहमी सांगत असत. त्यांनी नाथांची केवळ वचने सांगितली नाहीत, तर तसे समतोल आदर्श जीवन ते स्वतः जगले. नाथांच्या गिरीजासारखी सद्‌गुरूंना 'शारदामाई'ची अखंड साथ लाभली. कुटुंबाची संपूर्ण जबाबदारी सांभाळून घरी आल्यागेल्या प्रत्येक नामधारकाचा हसतमुखाने पाहुणचार करणाऱ्या माई आदर्श पत्नी होत्या. सद्‌गुरूंची दिव्यशक्ती होत्या. त्यांच्या जीवनाचे बलस्थान होत्या. घरचे सर्व आवरून जवळजवळ सर्व ठिकाणी सद्‌गुरूंसोबत प्रवचनाला हजर असत. मुंबईतील कार्यक्रम असो किंवा बाहेरील प्रवचन दौरे असोत, सद्‌गुरूंची काळजी घेण्यासाठी त्या जातीने स्वतः सोबत जात असत. प्रवचनाच्या ठिकाणी माईना भेटण्यासाठी, त्यांचे दर्शन घेण्यासाठी अनेक स्त्रिया येत असत. त्या सर्वांच्या कुटुंबातील व्यक्तींची त्या आठवणीने चौकशी करत.

अनेक वर्षांनी त्यांची भेट घेतलेल्या व्यक्तीलाही त्या नावानिशी ओळखत असत. त्यांचे प्रेम हा नामधारकांना जीवनाधार वाटत असे. त्यांची वात्सल्यपूर्ण दृष्टी आनंदाचा ठेवा वाटत असे.

पाच तपांहून अधिक सद्‌गुरू व माई यांचे संसारिक आणि पारमार्थिक जीवन होते. इतक्या दीर्घ कालावधीतील त्यांच्या अनंत स्मृती अनेक ठिकाणी शब्दबद्ध झालेल्या आहेत. त्यांच्या त्या अनंत पवित्र स्मृती जगण्याची नवी उमेद देतात.

**डॉ. शारदा विजय निवाते**
९५६११११४४२५

# बालकट्टा

## बालकट्टा संस्कार कथेचा उत्तरार्ध -

शिक्षकांनी दिलेल्या प्रकल्पामध्ये वर्गातील इतर कोणालाही तीसच्या वर गुण मिळाले नाहीत. पण अनुला मात्र पन्नास पैकी पन्नास गुण मिळालेत.
असं काय केले होते अनुने?
प्रयोगशील विद्यार्थ्यांना जास्त गुण मिळतील असे शिक्षकांनी सांगितले त्यावर अनुने विचार केला, प्रयोगशील म्हणजे काय? तिला विज्ञानकथा आणि शास्त्रज्ञांच्या गोष्टी वाचण्याचा छंद होता. थोडा विचार केल्यावर नक्की काय करायचे तिच्या लक्षात आले. तिला ती कल्पना सुचली म्हणून खूप आनंद झाला. अनुने एकाच प्रकारचे कडधान्य न घेता पाच कडधान्ये निवडली. चणे, मूग, चवळी, वाल आणि मटकी. या पाचही प्रकारच्या कडधान्यांच्या बिया वेगवेगळ्या भांड्यातील पाण्यात चार-पाच तास भिजवल्या. आणि पुढे तिने काय केले माहीत आहे! फक्त माती न घेता वेगवेगळ्या माध्यामात त्या बिया पेरल्या. काही बिया साध्या मातीत, काही बिया वाळूत, काही नारळाच्या भुशात, काही गांडुळ खतात तर काही ही सर्व माध्यमं एकत्र करून पेरल्या. पेरणीसाठी कुंड्या म्हणून पेपर ग्लास वापरले. घरी टाकाऊ वस्तूंमध्ये पडलेल्या छोट्या छोट्या पेपर ग्लासमध्ये तिने ही पेरणी केली. याशिवाय प्रत्येक माध्यामातील काही कुंड्या उन्हात ठेवल्या तर काही सावलीत ठेवल्या. सर्व कुंड्यांना दररोज थोडे थोडे पाणी घालून तिने बियांच्या वाढीच्या नोंदी ठेवल्या.

अनुने निरीक्षणासाठी एक चार्ट बनवला. कडधान्याचे नाव, माध्यम (माती,वाळू वगैरे) आणि ऊन की सावली असा सर्व तपशील असलेला टेबल बनवून प्रत्येक दिवशी निरिक्षण करून नोंदी ठेवल्या. हा प्रयोग करायला तिला खूप मज्जा सुद्धा आली. शिक्षकांनी तिच्या या प्रयोगाला पैकीच्या पैकी गुण दिले. इतर मुलांनी एकाच कुंडीत एकाच प्रकारचे कडधान्य पेरुन त्याचे निरिक्षण केले. परंतु अनुने तुलनात्मक निरिक्षण केले होते, जो कोणत्याही अभ्यासाचा पाया असतो!

गोष्टीचे तात्पर्य - वाचनाने आणि चिंतनाने कल्पकता येते. कोणतीही गोष्ट मनापासून केली की त्यात यश मिळतेच. शाळेत शिक्षकांनी सांगितलेल्या गोष्टी, घरचा अभ्यास असो की प्रोजेक्ट असो तो आनंदाने, आवडीने व गोडीने केला की नवीन शिकायला मिळते आणि मनोरंजन सुद्धा होते.
तर काय बालदोस्तांनो आवडली का गोष्ट. तुमच्या प्रतिक्रिया आमच्यापर्यंत नक्की पोहोचवा

कथा लेखन -**अनिता मोरे**
९९६७९६६१५०

***फेब्रुवारीच्या अंकात दिलेली संस्कार कथा पूर्ण करा असे सांगितले होते. काही बाल मित्रमैत्रिणींनी खूप छान प्रयत्न केला आहे. कथेचा उत्तरार्ध पाठवला त्यांची नावे प्रसिद्ध करित आहोत.***

*१. सई विश्वनाथ पाटील - कांजूरमार्ग पूर्व*
*२. स्वरा स्वप्निल राऊळ - कांजूरमार्ग*
*३. आर्यन प्रदिप सुतार - किसननगर, ठाणेमुलुंड,*
*४. यतीश चिपकर - विलेपार्ले*



# बालकट्टा

## बाल संस्कार केंद्रामध्ये मी काय मिळवले!

माझे नाव विहान दिनकर आहे. कामोठेला आमच्या संस्कार केंद्राची सुरवात २०२२ च्या दिवाळी मध्ये झाली. मी सुरवातीपासून बालसंस्कार केंद्रामध्ये जात आहे. तिथे आम्हाला विश्वप्रार्थना, हरिपाठ, स्वयंसूचना, कृतज्ञेची साधना, आपले चालते-बोलते सात देव यांची ओळख याचबरोबर वेगवेगळे विषय समजावून दिले जातात. विचारांचे शास्त्र, मनाचे शास्त्र, अभ्यासाच्या पद्धती, goal set कसा करायचा, जीवनात पॉझिटिव्ह राहणे, सेल्फ कॉन्फिडन्स, दृष्टिकोन, संगत, निसर्गनियम, सण कसे साजरे करायचे अशा अनेक विषयांवर संवाद होतो.

याचा उपयोग मला माझ्या शालेय जीवनात तसेच रोजच्या दैनंदिन जीवनात होत आहे. मी कराटेचे प्रशिक्षण घेत आहे. बालसंस्कार केंद्रामध्ये येऊन मिळालेल्या ज्ञानाचा वापर मी कराटे प्रशिक्षणासाठीही करतो. संस्कार केंद्रातमध्ये मॅडम नेहमी यशस्वी व्यक्तींच्या प्रेरणादायी गोष्टी आम्हाला सांगतात. या गोष्टी मला खूप आवडतात. बालकट्टा ही activity आमच्या संस्कार वर्गाच्या दिवशी शेवटी होते. यामध्ये आपल्याला काही अनुभव, गोष्टी तसेच काही नवीन संगायचे असेल तर बोलण्याची संधी दिली जाते किंवा काही न समजलेल्या गोष्टींची चर्चा इथे होते. यामुळे माझा सेल्फ कॉन्फिडन्स वाढला.

काही दिवसांपूर्वी आमची कराटे ची 22 IAF state level competition जाहीर झाली. त्याच वेळी संस्कार केंद्रामध्ये मनाचे शास्त्र आणि goal setting हे विषय सुरू होते. मॅडमनी प्रत्येकाला goal set कसे करायचे हे सांगितले होते. मी विचार केला होता की, "येणाऱ्या स्टेट level competition मध्ये सिल्व्हर किंवा ब्रॉंझ मेडल मिळवायचे" संस्कार केंद्रात हा विचार बोलून दाखवला होता. मॅडमने मला अजून मोठा विचार कसा करायचा याचे मार्गदर्शन केले. त्यांनी मला सांगितले की "योग्य दिशेने प्रयत्न केले तर तू गोल्ड मेडल सुद्धा मिळवू शकतोस. तुझ्याकडे सेल्फ confidence व सकारात्मक विचार आहेतच" यासोबतच अनेक उदाहरणे समजावून सांगितली. माझ्या मधला confidence अजून पॉझिटिव्ह झाला. Goal set करुन लिहिलेला पेपर मी पुढील संस्कार केंद्रात मॅडमला दाखवला "गोल्ड मेडल मिळवायचे आणि सुवर्ण पदक मिळवायचे" असे एका पेपरवर लिहले होते आणि मी त्याचे visualisation सुरू केले होते. Competition ची practice त्याचबरोबर प्रार्थना आणि सर्वांचे आशिर्वाद माझ्याबरोबर होते.

आनंदाची गोष्ट अशी की मला या राज्यस्तरीय स्पर्धेत गोल्ड मेडल मिळाले. माझ्या यशामुळे आईबाबांना खूप आनंद झाला. सर्व जण माझ्यावर खूप खूश होते. संस्कार केंद्रामध्ये मी ही बातमी सांगितली मॅडमने सर्व विद्यार्थ्यांसमोर माझे कौतुक केले. माझा अनुभव सर्व पालकांना सांगितला. या सर्व यशापाठी संस्कार केंद्रामध्ये दिलेले ज्ञान, प्रॅक्टिस, व पॉझिटिव्ह राहिलो यामुळे मी competition जिंकलो. यापुढे मी अजून यशस्वी होणार आहे. तसेच शाळेच्या अभ्यासात या ज्ञानाचा उपयोग करुन तिथे सुद्धा अजून यशस्वी होणार आहे. जीवनविद्या मिशनच्या बालसंस्कार केंद्राला मनापासून धन्यवाद!

**विहान दिनकर**
बालसंस्कार केंद्र (ऑफलाईन) कामोठे, नवी मुंबई
केंद्र चालिका - पद्मावती नारकर



# बालकट्टा

## संगत यशाची...

मला जीवनविद्या मिशनच्या कार्यामध्ये बालसंस्कार केंद्र चालिका, संगीत जीवनविद्या, संस्कार शिक्षण अभियान आणि 'तूच आहे तुझ्या जीवनाचा शिल्पकार' या कोर्सची फॅकल्टी म्हणून कार्य करण्याची संधी मिळत असते. आणि या कार्याची पोचपावती म्हणून मला माझ्या जीवनात सुख, शांती, समाधान, आनंद, आरोग्य, यश, समृद्धी मिळत आहे.

२०१३ या वर्षी २५ डिसेंबरला मी अनुग्रहीत झाले. तेव्हा मी एम. ए., बी.एड. शिक्षण घेतलेली असून सुद्धा खूप काळजी, चिंता करणारी होती. माझं कसं होईल? माझ्या मुलांचं भविष्य कसं असेल? असे अनेक प्रश्न माझ्यासमोर होते, पण जेव्हापासून मी नियमितपणे सत्संगाला येऊ लागले, मुलांना घेऊन बालसंस्कार केंद्रात स्वतः बसू लागले तेव्हा माझे प्रश्न, काळजी, चिंता मिटली आणि माझ्या जीवनात आनंदाची पहाट उगवली. ग्रंथ वाचन केल्याने, सद्गुरूंचे, प्रल्हाददादांचे व अनेक प्रवचनकारांचे मार्गदर्शन ऐकल्यानंतर विचारांचे महत्त्व व संगतीचे महत्त्व पटले. हळूहळू मनस्थिती बदलल्यामुळे परिस्थितीही बदलत गेली. माझ्यात झालेला हा बदल पाहून माझे मिस्टरही सत्संगाला येऊ लागले. माझ्या मुलांवरही नकळतपणे चांगले संस्कार होऊ लागले आणि घरात आनंद मिळू लागला. थोड्याच दिवसात मी ग्रंथदिंडी करू लागले, संगीत जीवनविद्येत गायला लागले, बालसंस्कार केंद्र चालिका म्हणून कार्य करू लागले. यामुळे समाजात मला मानसन्मान मिळू लागला.

लहानपणी चंचल, मस्तीखोर असणारी माझी मुले केवळ जीवनविद्येच्या नकळत होणाऱ्या संस्कारांमुळे शांत, हुशार, गुणी व शहाणी झाली. आता माझी मुलगी अनुजा बारावीमध्ये शिकत आहे. आणि मुलगा पार्थ ६ सहावीत "जवाहर नवोदय विद्यालय" माणगाव, रायगड. येथे शिकत आहे. पार्थला नुकत्याच झालेल्या इयत्ता पाचवीच्या "महाराष्ट्र राज्य शिष्यवृत्ती" परीक्षेमध्ये उज्वल यश मिळाले आहे. त्याचा पनवेल तालुक्यात दुसरा क्रमांक आला आहे आणि तो शिष्यवृत्ती पात्र ठरला आहे. हे पार्थला मिळालेले यश केवळ बालसंस्कार केंद्रामध्ये ज्या अभ्यासाच्या पद्धती शिकला त्यामुळे आणि कृतज्ञता डायरी रोज लिहिल्यामुळे मिळाले आहे. त्याबद्दल मी जीवनविद्येची, सद्गुरूंची आणि संपूर्ण पै फॅमिलीची खूप खूप कृतज्ञ आहे.

पार्थ जेव्हा नवोदयच्या परीक्षेसाठी अभ्यास करत होता तेव्हा रोज रात्री कृतज्ञता डायरी लिहिताना एक वाक्य आवर्जून लिहीत होता की, ' सद्गुरू कृपेने मला जवाहर नवोदय विद्यालयात शिकण्याची संधी मिळत आहे. यासाठी मी सद् गुरू, आई- पप्पा, शिक्षक, सर्व मित्र आणि अंतर्मनाचा खूप खूप आभारी आहे.' या डायरी लेखनामुळे त्याचा आत्मविश्वास खूप वाढला



# बालकक्ष

आणि जवाहर नवोदयच्या परीक्षेत त्याला उत्तमोत्तम यश मिळाले आणि पहिल्याच लिस्टमध्ये त्याचे सिलेक्शन देखील झाले. मराठी माध्यमातून शिकणारा माझा पार्थ आज *CBSE* बोर्डचे शिक्षण अगदी फ्री मध्ये घेत आहे. अगदी दोन वर्षांचा असल्यापासून तो माझ्याबरोबर जीवनविद्येच्या सर्व कार्यक्रमात येत असल्यामुळे त्याला तबला वाजवण्याची आवड निर्माण झाली. त्यामुळे त्याने तबल्याच्या चार परीक्षा दिल्या आहेत. त्याला वाचनाची ही इतकी आवड निर्माण झाली आहे की त्याने इतक्या लहान वयात वॉलॉग, पावनखिंड, द सीक्रेट, द मॉरिस गुडमन, एक होता कार्व्हर, श्यामची आई, मन मे है विश्वास यासारखी अनेक मोठमोठी पुस्तके वाचली आहेत.

आजकालच्या सर्व पालकांना मुलांबाबत, त्यांच्या संस्कारांबाबत खूप काळजी, चिंता वाटत असते. मी त्यांना एवढेच सांगेन की तुम्ही फक्त मुलांना जीवनविद्येच्या संगतीत घेऊन या आणि जीवनविद्येच्या कार्यात नेहमी तत्पर रहा. आपली सर्वांची मुलं या जीवनविद्येच्या ज्ञानाने नक्कीच टॉपला जाणार.

**शोभा सुभाष ताटे**, कळंबोली, नवी मुंबई
८४५२८६४२९१

**सर्वांना यश मिळू दे....**

मी प्रथमेश काजारी एम.एन.आर. स्कूल ऑफ एक्सलेन्स, कामोठे या शाळेचा आठवीत शिकणारा विद्यार्थी आहे. मी अभ्यासात हुशार आहेच पण मला नृत्याची (dance) सुद्धा खूप आवड आहे. मी लहानपणापासूनच डान्स क्लासला जातो. घरी सुद्धा डान्स प्रॅक्टिस करतो. क्लासमध्ये डान्स कॉम्पीटिशन सीजन-१ मध्ये भाग घेतला होता पण मला त्यात यश मिळाले नाही.

मी जीवनविद्या मिशनच्या बालसंस्कार केंद्रामध्ये माझ्या मित्रांबरोबर जाऊ लागलो. तिथे सांगितल्याप्रमाणे मी पॉझिटिव्ह आणि सुपर पॉझिटीव्ह विचार करणे फॉलो करायला लागलो. मी नियमित रात्री झोपण्यापूर्वी विश्वप्रार्थना बोलतो. नंतर डान्स कॉम्पीटिशन सीजन-२ जेव्हा आला तेव्हा मी ह्या कॉम्पीटिशनसाठी तयार होतो. माझा डान्स चांगला झाला आणि मला सीजन-२ चा दुसऱ्या क्रमांकाचे बक्षीस मिळाले. मी स्पर्धेत जिंकणारच असा पॉझिटिव्ह विचार करत गेलोच पण सुपर पॉझिटिव्ह म्हणजे सर्वांना यश मिळू दे असाही विचार करत होतो. त्यामुळे मला यश मिळाले. त्यासाठी जीवनविद्या मिशन बालसंस्कार केंद्राचा मी खूप आभारी आहे.

**प्रथमेश काजारी**
जीवनविद्या बालसंस्कार केंद्र, कामोठे
केंद्र चालिका - पद्मावती नारकर



# माईंची आठवण व मनोगत

सद्‌गुरू श्री. वामनराव पै यांना जन्म देणाऱ्या आदरणीय व पूजनीय मातेच्या चरणी प्रथम साष्टांग दंडवत. तसेच सद्‌गुरू श्री पै माऊली व त्यांना अखंडपणे साथ देणाऱ्या मातृतुल्य माई यांना माझे अनंत कोटी प्रणाम. सद्‌गुरूंच्या विचारांची फुले सामान्य माणसांपर्यंत पोहचविणाऱ्या सर्व प्रवचनकारांना माझे कृतज्ञतापूर्वक वंदन. तसेच जीवनविद्येतील प्रत्येक नामधारक व बालगोपाळ यांना माझे हृदयापासून अनंत कोटी प्रणाम.

माईंना असलेल्या नामधारकांसाठीच्या काळजीचा, माईंच्या सहवासातिल दिव्यत्वाचा मला आलेला अनुभव

मी नवीनच जीवनविद्येत आले होते ते नवी मुंबईतील भिरूड कुटुंबीयांमुळे. सद्‌गुरूंचा वाशीला कार्यक्रम होता. तिथे भिरुड ताईंसोबत मी गेले होते. माझा मुलगा तेव्हा तीन वर्षांचा होता, त्याला आणि माझ्या भाच्याला मी सोबत घेऊन गेले होते. कार्यक्रमाला अजून वेळ होता.



सद्‌गुरू दुपारी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करत होते. कार्यक्रम ज्या मैदानात होता तिथे छोटे छोटे तंबू होते. एका तंबूमध्ये माई दरवाज्यापाशी बसल्या होत्या. माझा मुलगा व भाचा तेजस यांना घेऊन बसले होते. भिरुड ताईंनी मला आणि मुलांना सद्‌गुरूंच्या दर्शनासाठी आत पाठवले. आम्ही सद्‌गुरूंचे दर्शन घेतले आणि सद्‌गुरूंनी आम्हाला आशीर्वाद दिले आणि थोडा वेळ बस म्हणाले. आम्ही थोडा वेळ बसलो व नंतर माईंजवळ आलो. माईंना नमस्कार केला. माई म्हणाल्या, "दोन्ही मुले तुझीच का?" मी हो म्हटले कारण सद्‌गुरू प्रवचनात सांगत, "नणंदेच्या मुलाला पण आपण आपले मूल म्हणून वागवले पाहिजे." म्हणून मी हो म्हटले होते. तर माई म्हणाल्या, "छान ग. किती जीव लावतेस नणंदेच्या मुलाला पण." माईंनी मुलांचा पापा घेतला. "संसार काटकसरीने कर, मुलांना बालसंस्कारला पाठव" असे माईंनी सांगितले आणि मला सोनसाफ्याचे सुंदर फुल दिले. मी बाहेर आले आणि आश्चर्यचकितच झाले की माईंना कसे कळले की तो नणंदेचा मुलगा आहे म्हणून! मला हळूहळू जीवनविद्या समजत गेली. सद्‌गुरू जेव्हा माईंचा सन्मान करायचे तेव्हा समजत गेले की कशी होती आपली प्रेमळ माई व नामधारकांची काळजी घेणारी.

दुसऱ्या अनुभवाबद्दल सांगायचे तर एकदा माझ्या मिस्टरांना हार्ट अटॅक आला होता. ते कॅन्सर पेशंट होते. त्यामुळे त्यांना पुण्याला हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले. त्यांना आयसीयू मध्ये ठेवले होते. तेव्हा मी एकटीच होते त्यांच्याजवळ. संध्याकाळपर्यंत ते बेशुद्धच होते.

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर
स्वच्छता अभियान
स्वच्छतेची जोपासना हीच ईश्वराची उपासना
ओला-सुका ई-कचरा वर्गीकरण व विल्हेवाट प्रशिक्षण
घरगुती व उद्योग क्षेत्रातील शुन्य कचरा उद्दिष्ट्य
सेंद्रीय खत निर्मितीचे प्रशिक्षण व जनजागृती
संपर्क : सुदर्शन कामुनी : ९८६९०४७९९१




आयसीयूमध्ये थोडावेळ थांबून मी बाहेर जाताना दरवाजापर्यंत आले आणि माझ्याकडून आपोआप ओठांवर *माई आमची माता, सद्गुरू पिता, नामधारकांची संगत असता काय कुणाची भीती* हे गाण सारखं सारखं येत होतं. दरवाजातून बाहेर पडले तर बघते तर काय? मला माई दिसल्याचा भास झाला. त्यांनी माझ्या डोक्यावरून हात फिरवला असे वाटले. माझी प्रार्थना सुरूच होती. मी लिफ्ट मधून खाली आले तेव्हा मला एक ओळखीच्या ताई भेटल्या. त्या माझ्याकडे बघून हसल्या आणि म्हणाल्या काही मदत हवी असेल तर सांगा. मी त्यांना म्हणाले की, "मी माझ्या फोनचा चार्जर घरी विसरली आहे. माझा भाऊ गावावरून पुण्याला येणार आहे. पण त्याला माहीत नाही हॉस्पिटल कुठे आहे ते. तो फोन करेल पण माझा फोन आता बंद होईल." माझ्या फोनला मॅच होणारा चार्जर नेमका त्या ताईंकडे होता. त्या म्हणाल्या की, "तू जितके दिवस या हॉस्पिटलला थांबशील तितके दिवस हा तू वापर आणि तुला काही पैसे, औषधं किंवा कुठलीही मदत लागली तर मला सांग. माझे सासरे, भाऊ, दीर आहेत दवाखान्यात. ते तुला मदत करतील." मला एवढा आनंद झाला की जणू व्यवस्था रुपाने माईंच एवढ्या मोठ्या हॉस्पिटलमध्ये त्या ताईंच्या रुपात भेटल्या. त्या ताई मला आपणहून भेटणं ही एक दिव्य व्यवस्थाच होती माझ्यासाठी. माझी सतत विश्वप्रार्थना सुरू असल्याने निसर्ग नियमानुसार अंतर्मनाने केलेली ती व्यवस्था होती

अशी आपली सर्व नामधारकांची काळजी घेणारी, नामधारकांच्या मनातलं ओळखणारी दिव्य स्वरुप माई, सद्गुरू हाच देव असा भाव असणारी, जीवनविद्या जगणारी आपली माई लाख गुणांची! माई तुम्हाला खूप खूप कृतज्ञतापूर्वक अनंत कोटी वंदन, प्रणाम.

**गोड गोड पुरणपोळीवर तूप म्हणजे माई.**
**पृथ्वीवरती देवाचे रूप, म्हणजे माई.**
**माई असते खमंग थालीपीठावर लोणी.**
**तिच्यातून जन्मते जीवनविद्येची कहाणी.**

**अर्चना भोगे**, कळंबोली
८३५६९६३१२७






# प्रश्न तुमचा उत्तर प्रल्हाददादांचे

६ फेब्रुवारीला योगी सभागृहात माईंच्या प्रति सर्वांनीच कृतज्ञता व्यक्त केली. त्यादिवशी प्रल्हाद दादांनी सांगितले की, माईंकडून आपण काय शिकलो याला महत्त्व आहे. आपल्याला माईंचच्या सर्वच गुणांपैकी तीन सर्वोच्च गुण अंगीकारायचे असतील तर ते तीन सर्वोच्च गुण म्हणजे आपल्या पतीप्रती, कुटुंबाप्रती असलेली बांधिलकी. माईंची सद्‌गुरू प्रति बांधिलकी इतकी घट्ट होती त्यामुळेच त्यांनी सद्‌गुरूंच्या कार्यात दिलेला सहभागा अजोड आहे. दुसरा सर्वोच्च गुण म्हणजे माईंकडे असलेले समाधान विवाहानंतर सद्‌गुरूसोबत सुरू झालेला संसार. हा गिरगावच्या छोट्या घरापासून सुरू झाला त्यानंतर ते दादरच्या वन बेडरूम किचनच्या घरात आल्या. त्यानंतर बऱ्याच वर्षांनी ते बोरवलीच्या बंगल्यात आले. माई छोट्या घरातही समाधानी होत्या आणि बंगल्यात आल्यावरही समाधानी होत्या. जेव्हा संसारात फार काही नव्हते तेव्हाही त्या समाधानी होत्या आणि सर्व काही मिळाले तरी त्या समाधानी होत्या. माईंचा कुठल्याही परिस्थितीत समाधानी राहणे हा गुण आपण सर्वांनीच आत्मसात केला पाहिजे.
माईंचा आणखीन एक महत्त्वाचा आणि सर्वोच्च गुण म्हणजे सहनशीलता. त्यांनी कधीच कुणाबद्दल तक्रार केली नाही. त्यांच्या जीवनात कोणीच चुकीची वागणारी माणसे आली नाहीत




असे नाही. तरीही त्यांच्याबद्दल कुठलीही तक्रार न करता माई सर्वांच्याच बाबतीतील आपले कर्तव्य अत्यंत निष्ठेने करत राहिल्या. माईंचे हे तीनही गुण आपण सर्वांनी आत्मसात केले पाहिजे. त्यांच्यासारखी माता आपल्याला मिळाली म्हणूनच आपण सुखी झालो आहोत. म्हणून त्यांचे हे तीन गुण अंगीकारण्याचा प्रयत्न करू असे वचन आपण सद्‌गुरूंना देऊया.

प्रश्न :- नियती म्हणजे काय आणि शुभ नियती कशी निर्माण करायची ?
उत्तर :- संचित प्रारब्ध आणि क्रियमान यातून आपल्या वाट्याला येते ते नशीब. लोकांचा असा समज आहे की आपले नशिब ठरलेले आहे. नशिबात घडायचे आहे ते घडवूनच राहणार. नियतीची संकल्पना न समजल्यामुळे आपल्याला आपल्या कर्माचे महत्त्व समजले नाही. प्रारब्ध प्रमाणेच आपल्या जीवनात घडत राहणार असेल लोक समजत राहिले. जन्मानंतर पाचव्या दिवशी सटवी येऊन कपाळावर काहीतरी लिहिणार आणि तसेच जीवनात घडत राहणार. जीवनात जे काही करण्याची बुद्धी होते ती बुद्धीसुद्धा प्रारब्धाप्रमाणेच होणार. जे काही आहे ते फक्त वरच्याच्याच हातात आहे.
"भाग्य से ज्यादा और समय से पहिले कुछ नही मिलता" असा लोकांचा समज आहे. या सर्वांचा अर्थ काय तर लोकांनी प्रारब्धाला महत्त्व दिले आणि क्रियमानाकडे दुर्लक्ष केले. क्रीयमानातून आपली नियती निर्माण होते हे लक्षात न आल्यामुळे लोकांचा गोंधळ झालेला आहे. लहानपणापासून माणसावर जे संस्कार होतात त्या संस्काराप्रमाणे माणसाच्या मनात वासना निर्माण होतात आणि या वासनांप्रमाणे त्यांच्या हातून कर्म म्हणजेच क्रियेमान घडते. विचार, उच्चार आणि आचार कर्माच्याद्वारे माणसाची नियती घडत असते. नियती निर्माण होण्याची साखळी सद्‌गुरूंनी आपल्याला सांगितलेली आहे. परिस्थितीप्रमाणे संगत, संगतीप्रमाणे संस्कार या संस्काराप्रमाणे वासना निर्माण होतात. वासनेतून विचार, उच्चार, आचार त्याद्वारे

कर्म केली जातात. संस्काराप्रमाणेच अंतर्मनाचा पॅटर्न तयार होतो आणि आपली कर्मे घडत असतात. या कर्माप्रमाणेच म्हणजेच क्रियामानाद्वारे आपली नियती निर्माण होते. कर्मातून पाप पुण्य आणि त्यातून सुख दुःख आपल्याला मिळत असते. आपल्याच कर्मातून निर्माण झालेल्या नियतीमुळेच आपल्यावर सुख दुःखाचे प्रसंग येत असतात. मानवी जीवनात नियतीला अत्यंत महत्त्व आहे आपण या जन्मात केलेल्या बहुतांशी कर्माची फळे ह्याच जन्मात भोगावे लागणार आहेत. प्रारब्ध आणि नियती हे मानवी जीवनातील महत्त्वाचे फॅक्टर आहेत. प्रारब्ध आणि नियती हे एकमेकांसोबत चाललेले असतात. त्यातूनच आपले शिल्प घडत असते. प्रारब्ध आपण कसे भोगत असतो यालाच क्रियमान म्हणतात. एकच परिस्थिती दहा लोकांच्या वाट्याला आली तर ते दहाही लोक कर्म करत असताना वेगवेगळ्या पद्धतीने करतात. परिस्थिती कुठलीही असो कर्म करण्याचे स्वातंत्र्य आपल्याकडे आहे. कुठल्याही परिस्थितीत चांगलेच आणि उत्तम कर्म करण्याची संधी माणसाच्याच हातातच आहे. परिस्थिती एकच असली तरी प्रत्येक माणसाची प्रतिक्रिया, प्रतिसाद हा वेगवेगळा असतो. प्रत्येक माणूस परिस्थिती वेगवेगळ्या प्रकारे हाताळत राहतो. प्रारब्ध बघताना ते कसे बघतो याला आपण क्रियमान म्हणतो. या क्रियमानातून आपली नियती निर्माण होत असते आणि आपण निर्माण केलेली नियती आपल्या सुखदुःखाला कारणीभूत होत असते. दहा लोकांची परिस्थिती एकाच असली तरी दहा लोकांची नियती वेगळी असते कारण कर्म करताना हे दहा लोक वेगवेगळ्या प्रकारचे कर्म करतात. या जन्मात आपल्या क्रियमानातून निर्माण झालेली नियती बहुतांशी आपण या जन्मात भोगत असतो. “सबकुछ उप्पर वाले के हाथ में” असे जे लोक म्हणतात ते चुकीचे आहे. ऊपरवाला हाच अंदरवाला आहे आणि अंदरवाला म्हणजेच आपले “अंतर्मन.” अंतर्मन हे कॉस्मिक कॅल्क्युलेशन करीत असते हा हिशोबही निसर्ग नियमाप्रमाणे चाललेला असतो. आपण केलेल्या कर्माप्रमाणे नियती घडत असते आणि कॉस्मिक कॅल्क्युलेशनप्रमाणे आपल्या वाट्याला सुखदुःख येत असतात. अशा प्रकारे आपले जीवन हे आपणच घडवत असतो. कॉस्मिक कॅल्क्युलेशन प्रमाणे आपल्या वाट्याला चांगली किंवा वाईट परिस्थिती येत असते. त्यासाठी आपण या जन्मात करीत असलेली कर्मे फार महत्त्वाची आहेत. ज्योतिषशास्त्र आपल्या प्रारब्धाप्रमाणे आपल्याला योग सांगतात. म्हणजेच शक्यता सांगतात आपण आपल्या कर्माद्वारे हे सारे परिणाम बदलू शकतो म्हणूनच “तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार”. आता वाट्याला आलेली परिस्थिती शहाणपणाच्या अधिष्ठान चांगली कर्मे करीत हाताळली तर जीवनात चांगलेच घडणार सद् गुरूंनी सांगितलेली ही नियतीची संकल्पना जर आपल्याला नीट समजली तर आपण खऱ्या अर्थाने आपले जीवन शिल्प उत्तमरीत्या घडवू शकतो.

प्रश्न :- वरील सर्व नियम ही प्राणिमात्रा लागू आहेत का ?

उत्तर :- इतर प्राणिमात्रा हे भोगयोनी आहेत. ते फक्त नियत कर्मच करतात. मनुष्य प्राण्याला बुद्धी दिलेली असल्यामुळे तो कर्म करू शकतो आणि त्या कर्माप्रमाणे तो प्रारब्ध बदलवू शकतो.

प्रश्न :- शुभ नियती कशी निर्माण करावी ?

उत्तर :- सद्गुरूंनी शुभ नियती निर्माण करण्याचा सोपा मार्ग सांगितलेला आहे. शुभचिंतावे, शुभ इच्छावे, वचनी शुभ बोलावे, शुभ कर्माच्या सामर्थ्याने सोने करावे जीवनाचे. जे काही कराल ते शुभच करा. सद्गुरूंचे महावाक्य आपण प्रत्येक कॉलच्या आधी घेतो ते म्हणजे, “तीन दिवस तरी शुभचिंतन करू शकला तरी तुमच्या बऱ्याच समस्या नाहीशा होतील”. जर तीन दिवस नाही जमले तर आयुष्यात कधीही तुम्हाला ते जमणार नाही. कारण ती चांगली सवयच तुम्ही लावून

घ्यायला तयार नाहीत. शुभचिंतन करणे वाटते तितके सोपे नाही त्यासाठी अट्टाहासाने प्रयत्नच करावा लागतो. तेव्हा शुभ चिंतनाची सवय होते ही एक साधना आहे. तुम्हाला जर अनिष्ट परिस्थिती आली तर शुभ नियती निर्माण करण्याशिवाय काहीच पर्याय नाही. बरेच लोक अनिष्ट परिस्थिती वाट्याला आली की कर्मकांडांच्या आहारी जातात. कर्मकांडे हा उपाय नाही तर कर्मचांग हा उपाय आहे. कर्मकांडे सोपे असतात पण कर्मचांग सोपे नसते. त्यामुळे लोक कर्मकांडांच्या मागे लागतात. त्यात अतोनात पैसा वाया घालवतात. कॉस्मिक कॅल्क्युलेशन बदलण्याची शक्ती कर्मकांडांमध्ये नाही तर ती शक्ती फक्त शुभकर्मा मध्येच आहे. निसर्ग नियमाप्रमाणे कॉस्मिक कॅल्क्युलेशन असतात. त्यामुळे तिथे कर्मकांडे उपयोगी पडत नाहीत तिथे शुभ कर्माचे इंटरॅक्शन उपयोगी पडते. शुभचिंतन, शुभईच्छा, शुभ बोलणे, शुभ कर्म यांची इंटरॅक्शन घातली तर तुमच्याच प्रारब्धात जे चांगले चांगले आहे ते तुमच्या वाट्याला येईल. म्हणून सद्गुरूंनी क्रियमानाला सर्वात जास्त महत्त्व दिलेले आहे. या क्रियमानाच्याद्वारे तुम्ही तुमचे शिल्प घडवू शकता म्हणून "तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार"

**इंडिया कॉन्फरन्स कॉल ८/२/२०२३**

चंचल अवस्थेतील मन हे मूर्ख मर्कट आहे, तर उन्मनी स्थितीत स्थिर झालेले मन हे मूर्त मारुती होय.

**सद्गुरू श्री वामनराव पै**

**Mind well, the Builder of destiny is mind.**

**Mr. Pralhad Wamanrao Pai.**

दि. 10/02/2023 रोजी क्रेडाई या builders association साठी नाशिक येथे लेक्चर झाले. या लेक्चर 100 builders नी लाभ घेतला. हे सर्व श्रोते एवढे प्रभावीत झाले की त्यांना पुढील ज्ञान मिळावे. कोर्सला येण्याची इच्छा प्रदर्शित केली. दुसऱ्या दिवशी दि. 11 तारखेला हिंदुस्तान एरोनॉटिकल लिमिटेड यांच्या अधिकाऱ्यांसाठी व संध्याकाळी स्टाफ आणि त्यांच्या कुटूंबियांसाठी "कोटुंबिक सौख्य" या विषयावर व्याख्यान होते. येथे सुध्दा सर्व श्रोते प्रल्हाद दादा, जीवनविद्येच्या प्रेमात पडले.








# मनमंदिरा

लेख १७

मन मंदिरा या लेखमालेत माणसाच्या तारुण्यवस्थेतील मनोविश्लेषण बघत आहोत. तरुणांच्या मानसिक अवस्थेचा विचार करत असताना लग्न हा विषय वासरून कसे चालेल! आयुष्याच्या या वळणावर प्रत्येक तरुण-तरुणीला जीवनाचा जोडीदार निवडण्याचे वेध लागतात आणि निसर्ग नियमानुसार ते योग्यच आहे. कोण असेल माझा जीवनसाथी? कसा असेल किंवा कशी असेल? मनात असे प्रश्न आणि कुतूहल निर्माण होते. जोडीदार कसा असावा याचे काही निकष मनातल्या मनात लावले जातात. दिसणं, आवडी, शिक्षण, पैसा इत्यादी अनेक गोष्टींच्या अपेक्षा मनात नकळत तयार होत असतात. प्रत्यक्ष वरसंशोधन-वधुसंशोधन करताना या अपेक्षेत ते बसतात का हे पाहिले जाते. अपेक्षेप्रमाणे वधु किंवा वर नसतील तर नकार दिला जातो. पण या सर्व अपेक्षा एकदाच्या जुळल्यावर झालेले विवाह किती यशस्वी होतात हा एक स्वतंत्र संशोधनाचा विषय आहे.

अपेक्षेप्रमाणे रुप, शिक्षण, पैसा असला तरीही स्वभाव जुळत नसेल तर संसार सुखाचा होणे कठीणच! स्वभाव नाही जुळले तर एकमेकांचे सूर जुळत नाहीत. सुरुवातीला इतरांच्या समोर सर्व आलबेल असल्याचे दाखवले जाते पण प्रत्यक्षात एकत्र रहाताना अजिबात पटत नाही आणि भांडणं होऊ लागतात. कधी कधी ती विकोपाला जातात आणि घटस्फोटाच्या वळणावर येतात. हे सर्व घडत जाते कारण मुळात लग्न जुळवताना मुख्य गोष्टीकडे दुर्लक्ष केलेले असते ती गोष्ट म्हणजे स्वभाव आणि सवयी. या गोष्टी एकमेकांच्या संपर्कात आल्याशिवाय लक्षात येत नाहीत.

एकवेळ पैसा कमी असेल तर चालेल कारण तो शिक्षण किंवा कौशल्य असेल तर तो नंतर कमवता येतो पण स्वभाव समजून न घेता लग्न करणे म्हणजे जुगारच! ही झाली नियोजित विवाहाची गोष्ट! प्रेम विवाहाची तऱ्हा अजून काही वेगळी नसते! लग्नाच्या आधी सर्वच गोड वाटतं पण एकत्र राहू लागले की एकमेकांमधील दोष दिसू लागतात. त्यामुळे दोन्ही प्रकारच्या लग्नात स्वभावाच्या बाबतीत सावध रहाणे खूप महत्वाचे असते.

तरुण वयातील प्रेम हे आयुष्याच्या वाटेवरचे वळण असते. पण प्रेमाच्या नावाखाली आज अनेक तरुण-तरुणी भरकटलेले दिसतात. अशा काही वाईट प्रवृत्तीमुळे लोकांचा या प्रेम भावनेकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलेला आहे. खरे प्रेम हे दुर्मीळ असते. आपल्या जोडीदाराचा त्याच्या गुणदोषांसहित स्वीकार करून एकमेकांना आनंदात ठेवण्याचा प्रयत्न करणे हे अपेक्षित असते. त्यासाठी प्रसंगी तडजोड करण्याची तयारी असेल तरच विवाह यशस्वी होतात. लग्नाच्या आधी एकमेकांसाठी सर्व काही करायला तयार असतात. लग्नानंतर मात्र गोष्टी बदलू लागतात. लग्नानंतर जबाबदारी, कर्तव्य, कामाचा ताण यामध्ये लग्नाआधीसारखं फक्त प्रेम आणि मजा करणं शक्य नसतं आणि हेच काही जणांना स्वीकारणं कठीण जातं. इथे स्वीकार आणि तडजोड जमली तर संसार सुखाचा होतो. एखादं नातं टिकणं किंवा तुटणं हे पूर्णपणे त्या नात्यातील व्यक्तींच्या स्वभावावर अवलंबून असतं. मग तो प्रेमविवाह असो की अरेंज्ड मॅरेज 'तरुणांनो सोने करा आयुष्याचे' या जीवनविद्या मिशन आयोजित अविवाहित तरुणांसाठी असलेल्या विशेष कोर्समध्ये लग्न, करिअर, प्रेमाचे गोड गुपित अशा विषयांवर मनमोकळा संवाद साधत मार्गदर्शन केले जाते. सर्व तरुण-तरुणींनी हा कोर्स जरुर करावा.

**अनिता मोरे**, सी.बी.डी. बेलापूर
९९६७९६६१५०



# काव्यांजली शारदामाई



## "हे सगळे पुरो जाता काय?"

माई तुला श्रद्धांजली वाहतो प्रेमे आम्ही
भावना वेगाने आसू ढाळतोही दो नयनी
आता तर तुझ्याच गुणांचे गीत गातो आम्ही
पण...." हे सगळे पूरो जाता काय?"

माई तुझ्या आठवणींचा पूर दाटून येईल मनी
तुझा खणखणीत आवाज घुमेलही कानी
तुझ्या प्रेमळ स्पर्शाची ऊब मिळेल भाव विश्वातुनी
पण...." हे सगळे पूरो जाता काय?"

माई तुझे स्वभाव विशेष उमटतील काव्यपंक्तींतूनी
तिथली जागा सोडुनी दिसतील का आमच्या वागण्यातूनी?
साधेसुधे तुझे रुप साठवूही दो नयनांतूनी
पण...." हे सगळे पूरो जाता काय?"

माई तू तर आहेस पै कुटुंबाची आदर्श गृहिणी
सद्गुरूंना साथ देऊनी झालीस जीवनविद्येची जननी
घर - नाती सांभाळूनी झालीस तू यशस्विनी
पण...." हे सगळे पुरो जाता काय?"

पतीचा सहवास, दिसे समाधान पत्नीच्या वदनी
माई तुझ्या समाधानाचे गुपित विचारले का कुणी?
तुझ्या त्यागाचे मोल सापडेल का कुठल्या खाणी?
पण...." हे सगळे पूरो जाता काय?"

माई तू तर कौतुकाची आहेस खास अधिकारिणी
अधिकार सोडूनी जन्मभर झालीस कर्तव्यपालिनी
जीवनविद्या परिवार राहील कायम तुझा ऋणी
तरीही माई कुठेतरी भासते आहे कमी
म्हणूनच म्हणते," हे सगळे पूरो जाता काय?

सौ. अपर्णा कैलास केळकर, विलेपार्ले

## आम्ही चालवू हा वारसा ग

माई तू आमची आहेस ग आई
तुझा सहवास लाभण्यासाठी
जीव आमचा झुरतो ग माई..
तुला बघता क्षणी डोळे तृप्त होतात अन
अश्रूंनी आनंद व्यक्त होतात ग....
तुझा स्पर्श अनुभवण्यासाठी
तुझा हात हातात घेण्यासाठी.. जीव माझा तुटतो ग....
तुझ्या चेहऱ्यावरील आनंद, माय लेकरांच्या भेटीचा
आठवतो अन पाझर फुटतो ग....
या जन्मी लाभली माई आम्हा
झिजवलास देह चंदनासारखा
प्रत्येक क्षणी आम्हा नामधरकांचा विचार केलास ग....
तुझ्या भेटीची आस क्षणोक्षणी असायची
शेवटच्या क्षणी आम्हा नामधारकाना भेटलीस ग
स्वतः प्रार्थना करता करता अमच्याकडूनही
प्रार्थना करून घेतल्यास ग.....
आम्हा नामधारकाना डोळे भरून पाहून
नंतरच माझी माई आसमंतात विराजमान झाली ग.....
आता प्रत्येक क्षणी सद्‌गुरू माई
माझ्या हृदयी आहेत
नाही जाऊ देणार कुठेही तुम्हाला
माझ्या श्वासात ठेवणार ग......
सद्‌गुरू माई तुम्हीच आमचा आहात श्वास
तुम्हीच आहात आमचा प्राण
जीवनविद्या कार्य शेवटच्या श्वासापर्यंत करून
आम्ही चालवू हा वारसा ग .........

अजिता निलेश घाडी, महावीर नगर

## आई म्हणजेच... माई

आसमंतातला " आ " आणि ईश्वरातला " ई " म्हणजेच आहे आई
या दोन अक्षरात किती साठले किती दाटले ..
आई म्हणजे जन्मदात्री.. आपल्या आयुष्याची आनंदयात्री..
आई म्हणजे जन्माची सखी, आपल्या असते कायम मुखी..
आई जिथे भेटते ती माई .. कधीही पहा कायम हसत मुखी
माई म्हणजे माया माई म्हणजे वटवृक्षाची छाया
माई म्हणजे प्राजक्त
प्रेमाचा वर्षाव मनसोक्त
माई म्हणजे प्रत्येक मनातलं अंगण
सारवलेलं.. बहरलेलं.. डवरलेलं....
माई म्हणजे माऊली.. माई म्हणजे सावली...
माई म्हणजे एकेक क्षण, सारच काही विलक्षण..
माई म्हणजे क्षणाक्षणाला शिक्षण..
माई म्हणजे वात्सल्यतेच औक्षण..
माई म्हणजे आनंदाचा विशाल डोंगर
माई म्हणजे अथांग महासागर
माई म्हणजेच प्रेमाचे आगर
माई म्हणजे दैवी अस्तित्व,
माई म्हणजे अनोखे कर्तृत्व..
माई म्हणजे खंबीर नेतृत्व
माई म्हणजे ओजस्वी दातृत्व
माई म्हणजेच अच्छादित मातृत्व
माई म्हणजे अन्नपूर्णा
तिची थोरवी कोणीही वर्णा
माई म्हणजे कोमल कर
माई म्हणजे मृदू मुलायम स्वर..
माई म्हणजे प्रेम वात्सल्य
ममता साऱ्या विश्वाची एकवटलेली समता
माई म्हणजे जोपासण,
माई म्हणजे सगळीकडे असणं
माई म्हणजे माऊली बरोबर कुठेही दिसणं
माई म्हणजे विश्वातला वावर
माई म्हणजे सर्वांना सावर..
माई म्हणजे सारी नात.. एकत्र असणार गणगोत..
माई म्हणजे कृती माई म्हणजे प्रकृती..
माई म्हणजे आकृती, साऱ्या साऱ्या देवांची स्वीकृती..
माई म्हणजे गाभाऱ्यातील समई शांत अस्मित तेवणारी,
माई म्हणजे प्रत्येक नामधारकांची खूप खूप साठवण
माई म्हणजे सर्वांची सदैव आठवण
माई सदैव आठवण ! आठवण !! आठवण !!!

सौ. रोहिणी पाटील, केरेवाडी

## जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा

भूतलावरी झाली मानवाची उत्पत्ती
एका स्त्रीच्या उदरातुनी ||१||
असते कुणाची मुलगी, कुणाची सून,
असते कुणाची पत्नी, कुणाची माता ||२||
नाती जपते सारी फुलासारखी
असते एक पण नाती सांभाळते अनेक ||३||
आहेत क्रांतिवीर महिला अनेक
क्रांती केली स्त्री शिक्षणाची ||४||
स्त्री हक्काची, स्त्री सन्मानाची
अन अखंड सौभाग्यवतीची ||५||
स्त्रीनेच स्त्री चा करूया सन्मान
देऊया एकमेकींना रोजच मान ||६||
क्रांतिवीर महिलांचा आदर्श घेऊया
त्यांच्याकडून आपण सारेच शिकूया ||७||

सौ. अजिता निलेश घाडी



## महत्त्वाकांक्षेला जीवनविद्येची जोड

अभिनंदन डॉक्टर शारदा निवाते

सद्गुरूंच्या नामधारक डॉ. शारदा निवाते यांनी नुकतीच संत एकनाथांच्या साहित्यावर Ph.D. मिळवली आहे. (विषय - संत एकनाथांच्या वाङमयातून व्यक्त होणाऱ्या वैश्विक मानवी मुल्यांचा चिकित्सक अभ्यास ) जीवनविद्या मिशन परिवारासाठी अतिशय अभिमानाची बाब आहे. संत एकनाथांच्या साहित्याचा अभ्यास करताना तुलनात्मक तत्त्वज्ञान आणि आधुनिक काळातील साहित्य म्हणून सद्गुरू श्री वामनराव पै यांच्या ग्रंथावर आधारित जीवनविद्या तत्वज्ञान त्यांच्या प्रबंधात त्यांनी मांडले आहे. तसेच या विषयावरील अधिक मार्गदर्शनासाठी त्यांनी संत एकनाथांच्या वंशजांना भेट दिली आणि त्यांच्याकडून मूळ ग्रंथांच्या प्रती मिळवल्या. या भेटीदरम्यान त्यांच्यासोबत मैत्रीपूर्ण संबंधही प्रस्थापित झाले.

डॉक्टर शारदा यांनी याआधी MA, M.ed या पदव्या मिळवून शिक्षणक्षेत्रात Ph. D मिळवली आहे. त्यावेळी बालगृह आणि निरिक्षण गृहामधील मुलांचा भावनिक विकास या विषयावर आधारित प्रकल्प राबवला होता. त्यावर आधारित शोधनिबंध पुस्तक रुपात प्रकाशित झाला असून त्या पुस्तकाचा अनेक शाळा आणि संस्था मार्गदर्शक म्हणून उपयोग करून घेत आहेत.

आर्थिक परिस्थितीमुळे किंवा कौटुंबिक कलहामुळे बिकट परिस्थितीत जीवन जगणाऱ्या कुटुंबातील जी मुले शाळेत येतात त्यांच्या भावविश्वाचा ठाव घेणाऱ्या सत्यकथा सांगणारा 'सात ते सव्वाबारा' हा कथासंग्रह प्रकाशित झाला आहे. डॉक्टर शारदा यांनी शिक्षक या नात्याने या मुलामुलींना त्यांच्या जीवनात ज्ञानाचा प्रकाश आणण्यासाठी सहकार्य आणि मार्गदर्शन केले आहे.

डॉ. शारदा या जेष्ठ नामधारक शंकर पालकर आणि सुनंदा पालकर यांच्या कन्या. काळाचौकीच्या हनुमान मंदिराजवळ (भक्तीयोग) रहात असल्याने अगदी बालपणापासूनच सद्गुरूंचा सहवास लाभला. त्यावेळी सद्गुरू अनेकदा आमच्या चाळीतील घरी येत असत. तेव्हा ते आम्हा मुलांना उच्च शिक्षण घेण्याविषयी मार्गदर्शन करीत असत. जीवनविद्येच्या ग्रंथांचा अभ्यास करायला सांगत असत. नंतरच्या काळात सद्गुरूंनी स्वतः पत्राद्वारे आणि फोनवर संपर्क करून शारदाला शिक्षणक्षेत्रात डॉक्टरेट करण्यासाठी आग्रह धरला.

लालबाग-परेलला होणाऱ्या ज्ञानेश्वर माऊली पुण्यस्मरण सोहळ्यामध्ये सद्गुरू त्यांच्या किर्तनाच्या आधी शारदाला जीवनविद्या तत्वज्ञानावर बोलण्याची संधी देत असत. त्यामुळे तिला विश्लेषणात्मक चिंतन करण्याची सवय लागली. आता ती महाराष्ट्रात शिक्षणतज्ज्ञ म्हणून खूप मोलाचे काम करत आहे.

श्री सद्गुरूंची गुणग्राहकता, शिष्यांविषयी असलेले अलोट प्रेम, त्यासोबतच माईंचे ममत्व आणि वात्सल्य यामुळे अनेक कुटुंबांची सर्वार्थाने प्रगती झाली. त्यापैकीच एक आमचे भाग्यवान कुटुंब! सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करीत असताना अतिशय अभ्यासपूर्वक आणि नियोजनबद्ध पद्धतीने संतसाहित्य या विषयात डॉक्टरेट प्राप्त करणे हे अवघड काम! परंतु डॉ. शारदा यांनी ते जिद्दीने नियोजित वेळेत पूर्ण केले.

उच्चविद्याविभूषित असूनही अनेक मोठ्या पदाच्या संधी नाकारून सामाजिक जबाबदारीचे भान राखून त्या कर्जत येथील एका शैक्षणिक संस्थेत, जिथे आदिवासी भागातील विद्यार्थी शिकतात, तिथे त्या शिक्षिका म्हणून कार्यरत आहेत. सध्या लायन्स क्लब ऑफ कर्जत डायमंड या संस्थेच्या अध्यक्षा म्हणून आदिवासी आणि शेतकऱ्यांची मुलं तसेच महिलांच्या विकासासाठी कार्य करीत आहेत.

चाळीतील एका लहानशा घरात रहाणाऱ्या मुलीने सद्गुरूंचे मार्गदर्शन, स्वतःची मेहनत आणि महत्त्वाकांक्षा तसेच समाजऋण फेडण्याची इच्छा यामुळे दोन विषयात doctorate प्राप्त केली आणि श्री सद्गुरूंचा विश्वास सार्थ ठरवला. आमची बहीण म्हणून आम्हाला शारदाचा खूप खूप अभिमान वाटतो

सद्गुरू चरणी समर्पण,
सुधीर पालकर / स्मिता भोसले / अनिता मोरे

# पर्यावरण हाच नारायण

कोयलीया बोले अंबुवा के डालपर।
ऋतु बसंत की देत संदेसवा।।

वसंत ऋतूची चाहूल लागताच कोकीळ पक्ष्याची कुहू-कुहू- ऐकू येऊ लागते. हा आवाज पावसाळ्यात आणि हिवाळ्यात मात्र एकदम गडप होतो. निसर्गातील या गूढ, अद्भूतरम्य गोष्टींची उकल माणसाला कधीच होऊ शकणार नाही. कारण ही आहे परमेश्वरी दिव्य व्यवस्था! स्वयंचलित, स्वयंनियंत्रित, नैसर्गिक, पद्धतशीर दिव्य व्यवस्था. निसर्गात निर्माण झालेल्या प्रत्येक गोष्टीची आपापली एक विशिष्ट पद्धत असते आणि ती स्वयंचलित स्वयंनियंत्रितपणे चालत असते. वसंत ऋतू मधील कोकिळ पक्षाचे गायन हा त्या अद्भुतरम्य व्यवस्थेतील एक सुंदर भाग आहे. पहाटे उठून कोकिळेचा आवाज ऐकून मन अगदी प्रसन्न होते. सृष्टीतील सर्व जीवांना ती जणू साद घालत असते. कोकीळ पक्षी गाताना आपण जर त्याच्या आवाजाची नक्कल केली तर तो आणखी जोरात गायला लागतो.



कुहू-कुहू गायन हा कोकीळ नरपक्ष्याचा आवाज असतो. कोकीळ मादीचा आवाज किक-किक-किक असा असतो. कोकीळ पक्षी बहुतेक वेळा कावळ्याच्या घरट्यात अंडी घालते किंवा तिला दिसेल अशा कोणत्याही इतर पक्ष्याच्या घरट्यात ती अंडे सोडून जाते. आपल्या घरट्यात सोडून दिलेली अंडी उबविणे, पिलांना खाऊ घालणे वगैरे कामे त्या घरट्यात राहणारे माता-पिता पक्षी करतात. निसर्गात अशा अनाकलनीय गोष्टी घडत असतात. कोकिळा स्वतःचे घरटे बांधत नाही, कोकिळेचा रंग कावळ्यासारखा काळा असतो आणि जर तुम्ही पहिल्यांदाच कोकिळा पाहिली तर अजिबात ओळखता येणार नाही कारण ती अगदी कावळ्यासारखी दिसते.

कृष्णशास्त्री चिपळूणकर यांची अन्योक्ती या निमित्ताने वाचकांसाठी देत आहे.

कोकिलान्योक्ती -

> येथे समस्त बहिरे बसतात लोक
> का मधुर भाषणे तू करिशी अनेक
> हे मूर्ख, यांस नसे किमपी विवेक
> रंगावरुन तुजला गमतील काक

कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनी आंब्याचे वर्णन करताना रचलेले काव्य (शार्दूलविक्रीडित)

ज्याचे पल्लव मंगलप्रद, शिणा छाया जयाची हरी
गंधें युक्ते फुलें, फळेंही असती ज्याचीं सुधेच्या परी,
वाटे जो रमणीय भूषण वनश्रीचे मुखींचें, भला
आम्रा त्या पिक सेवितां समसमां संयोग कीं जाहला।।

संस्कृतमध्ये पिक म्हणजे कोकिळ!



वसंत ऋतूत आंब्याला मोहोर आला की त्याचा मंद सुगंध आसमंतात दरवळतो. कोकिळ आंब्याच्या झाडावर कुहू कुहू करत वसंतऋतूचे आगमन झाल्याचे सांगतात. काही ठिकाणी एक प्रथा आहे तिथे होळीच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे धुलिवंदन/ धुळवडीच्या दिवशी . आम्रकुसुम प्राशन करतात. आंब्याचा मोहोर खातात. खूप छान लागतात ही फुलं. आरोग्याच्या दृष्टीने हितकारक असतात.

आंब्याची पाने आरोग्यासाठी देखील खुप फायदेशीर आहेत. या पानांमध्ये औषधी गुणधर्म आहेत. आंब्याच्या पानात काही महत्त्वाची जीवनसत्त्वे असतात. त्यात अँटिऑक्सिडंट गुणधर्म आहेत. हे आरोग्याशी संबंधित अनेक समस्यांवर मात करण्यास मदत करतात. याशिवाय समस्या उद्भवू नयेत म्हणून देखील उपयोगी आहेत. आंब्याची पाने पूजेत वापरली जातात. मंगलप्रसंगी दाराला तोरण म्हणून बांधतात. याच महिन्यात मराठी वर्षाचा पहिला दिवस म्हणजे गुढीपाडवा आहे. नववर्षाच्या स्वागतासाठी आपण गुढी उभारताना कडुलिंबाची पाने आणि आंब्याची पाने सुद्धा बांधतो. हे करण्यामागचा उद्देश हा आहे की लोकांना त्याचे महत्त्व लक्षात यावे. ही पाने फक्त सजावटीसाठी नसून आपल्या शरिरासाठी अत्यंत उपयुक्त अशा या वनस्पती आहेत.

या वर्षी मराठी नवीन वर्षाच्या निमित्ताने आपण संकल्प करुया आपल्या नेहमीच्या परिचयातील वनस्पतींमधील औषधी गुणधर्म जाणून घेऊन आरोग्य उत्तम ठेवण्यासाठी त्यांचा उपयोग करुया. नेहमी पूजेसाठी उपयोग केला जाणारे झेंडूची फुले, शेवंती, जास्वंद, दुर्वा, तुळस, बेल हे निर्माल्यात न टाकता त्याचा काढा करून पिणे किंवा इतर कोणत्या प्रकारे उपयोग करता येईल का याची माहिती घेऊया. आयुर्वेदिक वैद्यांच्या सल्ल्याने त्यांचे प्रमाण आणि पद्धत माहित करून घेता येईल. निसर्ग आपल्याला भरभरून देत असतो. आपण त्याच्याशी नैसर्गिक पद्धतशीर व्यवस्थेनुसार जोडलेले आहोतच पण त्याचे ज्ञान घेऊन जाणीवपूर्वक मनाने जोडले गेलो तर खरे ऐश्वर्य म्हणजे आरोग्य प्राप्त होईल हे निश्चित.

दीपस्तंभच्या सर्व वाचकांना मराठी नवीन वर्षाच्या खूप खूप शुभेच्छा

**अनिता सुनील मोरे**, सी.बी.डी. बेलापूर
९९६७९६६१५०



# पुण्यस्मरण एक आनंद सोहळा...

जीवनविद्या मिशनच्या वतीने 54 वा संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली पुण्यस्मरण सोहळा बेळगाव येथील संभाजी उद्यान येथे पार पडला आहे. सद्‌गुरू श्री वामनराव पै यांचे सुपुत्र श्री. प्रल्हाद वामनराव पै यांचे या ठिकाणी प्रबोधन झाले.

श्री प्रल्हाद वामनराव पै यावेळी प्रबोधन करताना म्हणाले की, ज्ञानेश्वर माउली सोहळा आणि विषय प्रत्येक कृती राष्ट्र हिताची विश्वशांती हे कसे? याचे उत्तर असे कि ज्ञानेश्वर माऊली काय, भगवान श्रीकृष्ण काय सर्वांना एकच सांगायचं असते. गीतेतले पहिले सहा अध्याय कर्मयोगावर दुसरे सहा अध्याय ज्ञान योगावर, तर तिसरे सहा अध्याय हे भक्ती योगावर आधारित आहेत. वास्तविक भगवत गीता समजायला कठीण म्हणून ७०० श्लोक सर्वांना समजावेत म्हणून ज्ञानेश्वर माउलींनी ९००० ओव्या लिहल्या म्हणजे भगवत गीता समजणे किती कठीण आहे हे कळेल. तरीही श्लोक आणि ओव्या मधून संताना नेमके जे सांगायचं ते कळत नाही कारण दोन्ही काव्यच आहेत. ओवी म्हणा किंवा अभंग यात जे काही सांगितले जाते ते थोडक्यात सांगितले जाते. संतांच्या वचनात शब्दार्थ, भावार्थ, गुह्यार्थ आणि परमार्थ असे चार अर्थ असतात. म्हणूनच ९००० ओव्या लिहिलेल्या प्रत्येक अध्यायात ज्ञानेश्वर माऊली म्हणतात हे तू सद्‌गुरूंकडून समजून घे.



पुढारी

बेळगाव, शुक्रवार, दि. ३ मार्च २०२३

## ‘जीवन विद्या मिशन’तर्फे ज्ञानेश्वर माऊली सोहळा

**बेळगाव : पुढारी वृत्तसेवा**

संभाजी उद्यानात 'जीवन विद्या मिशन'तर्फे ज्ञानेश्वर माऊली सोहळा उत्साहात झाला. उपमहापौर रेश्मा पाटील, भाजप नेते किरण जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरवात हरिपाठाने झाली. यानंतर झालेल्या संगीत जीवन विद्या कार्यक्रमाला व सद्‌गुरू वामनराव पै यांचे पुत्र प्रल्हाद पै यांच्या प्रबोधन कार्यक्रमाचा हजारो भाविकांनी लाभ घेतला.

प्रल्हाद पै म्हणाले, श्लोक आणि ओव्यामधून संताना नेमके जे सांगायचं ते सोप्या भाषेत कळावे म्हणून जीवनविद्येची निर्मिती झाली. सद्‌गुरुंनी जीवनविद्या निर्माण केली, याचे कारण सर्वच जण सुखी व्हावे, असेच आहे. जीवनविद्या म्हणजे जीवन जगण्याची कला आहे. ज्ञानेश्वरी, भगवद् गीतासुद्धा जीवन जगण्याची कलाच शिकवतात. सत्कर्म, निसर्गनियमांशी सुसंगत कर्म असले पाहिजे, म्हणून प्रत्येक कृती ही सर्वांच्या हिताची असावी.

कार्यक्रमाला बेळगाव, खानापूर, गोवा, पुणे, सातारा, सांगली, मिरज, कोल्हापूर, कोकण तसेच मुंबई येथून नागरिक उपस्थित होते. बेळगाव शाखेचे ट्रस्टी विलास परब, जीवनविद्या मिशनाचे सचिव काळे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम यशस्वी करण्यात आला. कार्यक्रमाचे निवेदन संतोष तोत्रे, प्रशांत बिर्जे, रेखा हिरोजी, रवींद्र सुळेभावी यांनी केले.

बेळगाव : प्रल्हाद वामनराव पै मार्गदर्शन करताना.

सर्वसाधारणतः लोकांनी या ओव्यांचे, संत वचनांचे भावार्थ मांडले ते परिपूर्ण नाही आहेत. यासाठीच ज्ञानेश्वरी, गीता, वेद उपनिषदे, संताचे अभंग व ऋषीमुनींचे तत्वज्ञान ह्या सर्वांचा अभ्यास, चिंतन करून या काळात सामान्य माणसांना, तरुणांना समजावून सांगण्यासाठीच मराठी भाषेत सोप्या पद्धतीत सद्‌गुरूंनी जीवनविद्या निर्माण केली. कर्मयोग, भक्तियोग व ज्ञानयोग यांचे सार थोडक्यात एकत्र सद्‌गुरूंनी जीवनविद्येत आणलेले आहे. भक्तियोग ज्ञानाशिवाय होवू शकत नाही तर ज्ञानयोग कर्मयोगाशिवाय होवू शकत नाही. तिन्ही योगाचे सार म्हणजे जीवनविद्या.

ज्ञानेश्वरी, भगवत गीता सुद्धा जीवन जगण्याची कलाच शिकवतात. ज्ञानेश्वरी किंवा भगवत गीतेत सच्चिदानंद स्वरूप फक्त शब्द आलेले आहेत पण याच्यावर सद्‌गुरूंनी “परमेश्वर आहे का?” हा ग्रंथ लिहून काढलेला आहे. सत, चित, आनंद स्वरूप काय ? याचा गुह्यार्थ काय ? याचा आपल्या जीवनाशी संबध काय ? हे अगदी साध्या सोप्या भाषेत समजावून सांगितले. आपल्या जीवनात कसे उपयोगात आणायचे हे समजून घेताना मला एक गोष्ट जाणवली ती म्हणजे या सर्व विचारांचे सार एका वाक्यात सांगायचे म्हणजे “प्रत्येक कृती ही राष्ट्रहिताची विश्वशांतीची.” हे सर्व सद्‌गुरूंनी आपल्या २८ ग्रंथात लिहून ठेवलेले आहे.

कर्मयोग सर्वात महत्वाचा आहे. प्रत्येक माणसाला कर्म करणे महत्वाचे आहे. कर्मावर आपला अधिकार असतो असे सद्‌गुरू सांगतात. फळ मिळेलच अपेक्षा असो किंवा नसो. सत्कर्म आणि दुष्कर्म हे कर्माचे प्रकार, यात इच्छा, विचार, उच्चार आणि आचार असे प्रकारे असतात. सर्वांच्या हिताचे कर्म हे सत्कर्म, निसर्गनियमांशी सुसंगत कर्म असले पाहिजे. म्हणून प्रत्येक कृती म्हणजे प्रत्येक कर्म ही सर्वांच्या हिताची सर्वांच्या भल्याची असली पाहिजे. कर्मयोगाला ज्ञानाचे अधिष्ठान पाहिजे.

कर्मयोग म्हणजे कर्माचे बंध आणि कर्म फळाचा आस्वाद दोन्ही टाकून, सोडून कर्म करणे. सर्व साधारणतः आपण मी, माझा आणि मलाच यात

अडकलेले असतो. यालाच कर्म बंध असे म्हणतात. कर्म केले की फळ हे मिळणारच. आपण करत असलेले कर्म सर्वांच्या हिताचे आहे का हे पाहणे आवश्यक. आपले मन मोठं करायला पाहिजे. मी केले, मलाच मिळाले पाहिजे, सर्व माझेच आहे हे योग्य नाही. वास्तविक सर्वांमुळे मी आहे आणि सर्वांमध्ये मी आहे. म्हणून मी कोणालाही दुःख दिले, त्रास दिला ते दुःख माझ्याकडेच सहस्त्रपटीने परत येणार हे लक्षात ठेवले पाहिजे. कारण "तू" आणि "मी" वेगळा नाहीच ही वस्तुस्थिती आहे. एकच मी अनेक झाला, अनंत रूपे अनंत वेषे, चर अचर रूपाने प्रगट झाला. सर्वात तो एकच आहे आणि तोच मी म्हणतो. सर्वांमुळे मी आहे ही कृतज्ञता आणि सर्वामध्ये मीच आहे हा अध्यात्म.

एक ओवी आहे " तू मन हे मी ची करी"याचा खरा अर्थ खूप खोल गुह्यार्थ आहे किंबहुना संपूर्ण दिव्य साधना त्यात आहे. "मी" म्हणजे जो सर्वात आहे आणि तोच सर्वातून "मी" म्हणतो तो "मी" आहे. संकल्प म्हणजे काय? हे ही कळत नसते म्हणून ज्ञानेश्वर माउलींनी म्हटल आहे सद्‌गुरूंकडून समजून घे. संकल्प म्हणजे तू जी कल्पना केलेली आहे तुझ्याकदे भ्रम झालेला आहे जो भवरोग जडलेला आहे त्यामुळे स्वरूपाचा विसर पडलेला आहे. "मी" देह ही कल्पना. "मी" देह नसून सत चित आनंद स्वरूप आहे हे सद्‌गुरूंशिवाय कळणे नाही.

राष्ट्र हित म्हणजे सर्वांचं हित, राष्ट्र आणि आपण वेगळे नाही. मी मी एकत्र येऊन समाज बनतो तर समाज समाज एकत्रित येतात तेव्हा राष्ट्र बनते. आपण जितकं व्यापक होऊ तितकं मोठे होऊ. म्हणून जे काही करतो ते राष्ट्राचा विचार करून करायला पाहिजे. आणि त्यातच विश्वशांती सुद्धा दडली आहे. राष्ट्रहित, राष्ट्र प्रेम, राष्ट्रभक्ती, राष्ट्र कर्तव्य आणि राष्ट्र संरक्षण हे राष्ट्रीय जीवनाचे पंचशील आपण आचरणात आणायला पाहिजे. "राष्ट्र शिस्त" आपण खरे सांगायचं म्हणजे अत्यंत बेशिस्त आहोत. नियम आपल्या दृष्टीने मोडण्यासाठीच असे वाटते. आपण राष्ट्र म्हणून विचार न केल्यामुळे अनेक परचक्र आपल्यावर चालून आले.

"राष्ट्र प्रेम" आपल्याला आपल्या जाती व इतर गोष्टींवर जितकं प्रेम तितकं राष्ट्रावर नाही हे दुर्दैव आहे "राष्ट्र संरक्षण" आपण राष्ट्राचे संरक्षण करायला सीमेवर जाऊ शकत नसलो तरी जवानांचा आणि राष्ट्रांच्या संपत्तीचा आदर केला पाहिजे. "राष्ट्रभक्ती" म्हणजे आपल्या वाट्याला आलेले काम प्रामाणिकपणे आणि प्रेमाने केले पाहिजे. आपली प्रगती म्हणजेच राष्ट्राची प्रगती हेच आपले "राष्ट्रकर्तव्य" असले पाहिजे. happiness index मध्ये भारत खूप मागे आहे. काही छोटे छोटे देश पुढे आहेत. कारण आपण सुख देत नाही लोकांना दुःख अधिक देतो त्यांचा दुःखात सुख शोधतो. आपण खरे तर फक्त संस्कार या एका गोष्टींमुळेच वेगळे आहोत. ते सोडले तर आपण सर्व एकच आहोत. म्हणून ही विश्वप्रार्थना सर्व भाषांमध्ये पोहचवत आहोत जेणेकरून सर्वात एक तो सर्वेश्वर, परमेश्वर कळेल आणि राष्ट्र आणि विश्व सुखी होईल. हेच आमचे ध्येय आणि हाच संकल्प. विश्वप्रार्थना सर्वांच्या पेशी पेशीत गेली पाहिजे, रक्तात भिनली पाहिजे.

यावेळी कार्यक्रमाची सुरुवात ज्ञानेश्वर महाराजांच्या हरिपाठाने झाली. त्याच बरोबर संगीत जीवनविद्या सादर करण्यात आली. या कार्यक्रमाला बेळगाव खानापूर, गोवा, पुणे, सातारा, सांगली, मिरज, कोल्हापूर, कोकण तसेच मुंबईवरून नामधारक उपस्थित होते. बेळगावच्या उपमहापौर सौ. रेश्मा पाटील आणि सामाजिक कार्यकर्ते श्री. किरण जाधव उपस्थित होते. कार्यक्रमाचे निवेदन श्री संतोष तोत्रे, प्रशांत बिर्जे, रेखा हिरोजी व रवींद्र सुलेभावी यांनी केले.

बेळगाव शाखेचे पालक ट्रस्टी श्री. विलास परब, जीवनविद्या मिशनचे सचिव दीपक काळे यांच्या मार्गदर्शनाखाली बेळगाव शाखेचे सर्व पदाधिकारी अरविंद अष्टेकर, प्रशांत बिर्जे, गोकुळ अकनोजी, राजेश सावंत व जेष्ठ प्रबोधनकार शंकरराव बांदकर, प्रभाकर देसाई सहित नामाधारक, युवा युवती ह्या सर्वांचा कार्यक्रम यशस्वी करण्यास मोठा हातभार लागला.

वृत्त संकलन :- **मधुरा शिरोडकर,** बेळगाव




जीवनविद्या मिशनचे प्रणेते सद्गुरू श्री वामनराव पै यांच्या सतशिष्या व प्रबोधक सौ. शितल गोरे यांना जागतिक महिला दिनी “साहेब प्रतिष्ठान” गोराई या संस्थेच्या वतीने मानपत्र व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. गेली तीस वर्षे सौ. शितल गोरे ह्या स्वतःचे कुटुंब व्यवसाय सांभाळून सद्गुरूंकडून मिळालेल्या ज्ञानाच्या माध्यमातून आणि आता श्री. प्रल्हाद वामनराव पै सद्गुरूंचे सुपुत्र व जीवनविद्या मिशनचे आजीव विश्वस्त यांच्या मार्गदर्शनानुसार समाजात जाऊन ज्ञानदानाचे कार्य मोठ्या प्रमाणात करीत आहेत. त्याचबरोबर त्या जीवनविद्या फाउंडेशनच्या विश्वस्त म्हणूनही कार्यरत आहेत. महाराष्ट्र, गोवा, बेळगाव इत्यादी ठिकाणी विद्यार्थी शिक्षक पालक तसेच समाजातील विविध स्तरातील महिला व पुरुष वर्गाला सतत मार्गदर्शन करीत असतात.

यावेळी माजी शिक्षण समिती अध्यक्ष नगरसेवक सौ. संध्या जोशी यांनी अशा प्रकारे स्वतःचे कुटुंब, व्यवसाय सांभाळून समाजासाठी काहीतरी नवीन करून दाखवणे हे खूपच कौतुकास्पद आहे असे गौरवोद्गार काढले. या कार्यक्रमात बोरवली पोलीस ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक अश्विनी घोलवे या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या.

## कोर्सेसचा आनंद

| Day | Date | Course |
|---|---|---|
| Tue-Wed | 14-15 March | Level 2 |
| Tue-Wed | 28-29 March | Level 3 |
| **Sat-Sun** | **08-09 April** | Level 2 |
| Tue-Wed | 11-12 April | Level 2 |
| Tue-Wed | 18-19 April | Level 2 |
| **Sat-Sun** | 22-23 April | Level 2 |
| Tue-Wed | 25-26 April | **Level 3** |


मार्च 2023 ४

समर्थ भारत परिवार

तेजस्विनी

# स्त्रीमुक्ती नव्हे तर स्त्री सन्मान करायला शिका

आज प्रत्येक क्षेत्रात महिला प्रगतीपथावर आहेत. बस कंडक्टर पासून ते अंतराळवीरपर्यंत सर्वच क्षेत्रात महिलांनी आपले अस्तित्व सिद्ध केले आहे. प्रत्येक क्षेत्रात स्त्रिया स्वतःची ओळख निर्माण करत आहेत. खरच ही आपल्यासाठी खूप अभिमानाची गोष्ट आहे. आज महिलांनी मानसिकदृष्ट्या सक्षम होणे अत्यंत गरजेचं आहे.

आधुनिक संत सद्गुरु श्री. वामनराव पै सांगतात की; समाजामध्ये फुल आणि मूल ही संकल्पना अत्यंत महत्त्वाची आहे. कारण यातूनच ती राष्ट्राचे उत्तम आरोग्य पण घडवत असते आणि कुटुंबाचे स्वास्थ्य समाजाचे हित व राष्ट्राची प्रगती साधण्यात तिचे महत्त्व प्रचंड आहे आणि ती सुसंस्कारित पिढी देखील घडवते. त्याचप्रमाणे आधुनिक संत सद्गुरु श्री वामनराव पै ठणकावून सांगतात की; ज्या घरात स्त्रियांचा छळ होतो; त्या घरात दैन्य व दुःख कायम वास करतात.

घरात आलेल्या सुनांची किंमत सोन्यात करायची नसते; तर त्यांच्या रूपाने लक्ष्मी सोन्याच्या पावलाने घरात प्रवेश करते हे ओळखायचे असते. म्हणूनच स्त्री मुक्ती नव्हे तर स्त्री सन्मान करायला शिकलं पाहिजे. समाजातील प्रत्येक स्त्रीचा आदर करायला शिकलं पाहिजे. मग ती मुलगी असो, सून असो, बहिण असो वा बायको किंवा कुठल्याही जातीची, धर्मांची असो स्त्रियांचा सन्मान हा झालाच पाहिजे.

**मीनाक्षी स्वप्निल वेंडे**
(जीवनविद्या मिशन संस्कार, शिक्षण अभियान आणि बालसंस्कार वर्ग संचालिका)

### स्त्रियांनीच स्त्रियांचा सन्मान केला पाहिजे

आम्ही सावित्रीबाई, रमाबाई जिजाऊंच्या लेकी आहोत. त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून प्रत्येक स्त्रीने समाजात वागलं पाहिजे आणि स्त्रियांनीच स्त्रियांचा सन्मान केला पाहिजे. कारण ती गृहलक्ष्मी आहे, अन्नपूर्णा आहे. आरोग्यदायीनी आहे आणि ती योग्य वेळी योग्य सल्ला देते म्हणून सल्लागार आहे. तसेच ती माता, भगिनी, तनया, मैत्रीण देखील आहे. म्हणूनच समाजामध्ये स्त्रीमुक्ती नव्हे तर स्त्री सन्मान करणे गरजेचे आहे.

वाटचाल ५७ वर्षांची, सकारात्मक विचाराची, सामाजिक बांधिलकीची !

|| समाजाय इदम न मम ||

# आहुति

संस्थापक : मा. दत्तात्रय त्रिवेदी

RNI No. MAH MAR 16935 / 66

स्थापना : ११ जून १९६६

अंकरनाथ। वर्ष:५७। अंक क्र.७। गुरुवार दि. १६ फेब्रुवारी २०२३ संपादक : गिरीश वसंत त्रिवेदी पाने :८। किंमत : २ रु.

## शारदामाई वामनराव पै यांचे सद्गुण अंगिकारणे हीच आदरांजली

'तेजोवलयांकित शारदा' कार्यक्रमात असंख्य नामधारकांनी व्यक्त केल्या भाव





मुंबई (प्रतिनिधी) :- सद्गुरु श्री वामनराव पै यांच्या निधनानंतर तब्बल १० वर्षे शारदा माईंनी जीवनविद्या मिशनच्या सर्व नामधारकांवर प्रेम केले. माईंनी आपल्या जगण्यातून 'जीवनविद्या ही जगायची असते' हा कानमंत्र दिला. आज शारदामाई जरी शरीराने आपल्यामध्ये नसल्या तरी ...

जीवनविद्या मिशनचे प्रणेते सद्गुरु श्री वामनराव पै यांच्या धर्मपत्नी शारदामाई पै यांचे २५ जानेवारी रोजी महानिर्वाण झाले. वयाच्या ९७ व्या वर्षी माईंनी अखेरचा श्वास घेतला. जीवनविद्या ज्यांच्या मुळे सद्गुरु श्री वामनराव पै यांना स्फुरली त्या माईंचे वृद्धापकाळाने निधन झाले. जीवनविद्या मिशनच्या वतीने दादर येथील योगी सभागृह... आदरांजली वाहण्यासाठी 'तेजोवलयांकि... कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. ... नामधारकांनी ... तून तसेच ... ठ, संगी ... करण ... शार ... प ... स्वी

# महासागर

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

मुंबई >> सोमवार, १३ फेब्रुवारी २०२३

## शारदामाई वामनराव पै यांचे सद्गुण अंगिकारणे हीच आदरांजली !

'तेजोवलयांकित शारदा' कार्यक्रमात असंख्य नामधारकांनी व्यक्त केल्या भावना

मुंबई, दि.१२। प्रतिनिधी



सद्गुरु श्री वामनराव पै यांच्या निधनानंतर तब्बल १० वर्षे शारदा माईंनी जीवनविद्या मिशनच्या सर्व नामधारकांवर प्रेम केले. माईंनी आपल्या जगण्यातून जीवनविद्या ही जगायची असते हा कानमंत्र दिला. आज शारदामाई जरी शरीराने आपल्यामध्ये नसल्या तरी त्या आठवणींच्या आणि ज्ञानाच्या रुपाने सर्व नामधारकांच्या हृदयात कायम राहणार आहेत. म्हणूनच शारदामाईंचे सद्गुण अंगिकारणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल, अशा शब्दांत सद्गुरु श्री वामनराव पै यांचे सुपुत्र प्रल्हाददादा पै यांनी श्रद्धांजली वाहिली. जीवनविद्या मिशनचे प्रणेते सद्गुरु श्री वामनराव पै यांच्या धर्मपत्नी शारदामाई पै यांचे २५ जानेवारी रोजी महानिर्वाण झाले. वयाच्या ९७ व्या ... माईंनी अखेरचा श्वा...

जीवनविद्या ज्यांच्या मुळे सद्गुरु श्री वामनराव पै यांना स्फुरली त्या माईंचे वृद्धापकाळाने निधन झाले. जीवनविद्या मिशनच्या वतीने दादर येथील योगी सभागृहात शारदामाईंना आदरांजली वाहण्यासाठी 'तेजोवलयांकि... शारदा' हा कार्यक्रम ... करण्यात आला ... यावेळी ... दिग्दि...

आले. तसेच यावेळी ... प्रिया निम्बित पै ... माईंच्या ... नामधारक ... एक ...

# आपले साम्राज्य

RNI NO. MAHMAR/2021/81699

## शारदामाई वामनराव पै यांचे सद्गुण अंगिकारणे हीच आदरांजली !;

'तेजोवलयांकित शारदा' कार्यक्रमात असंख्य नामधारकांनी व्यक्त केल्या भावना



# तरुण भारत

Pune Edition | 2023-02-21 | Page-2

epaper.mahamtb.com

## कुटुंब प्रबोधनतर्फे परिसंवाद संपन्न

आध्यात्मिकता आणि आधुनिक विश्व यावर मार्गदर्शन



# महासागर

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

मुंबई >> शुक्रवार, १७ फेब्रुवारी २०२३

## ग्राम समृद्धी अभियाना अंतर्गत आदिवासी पाड्यांमध्ये मोफत आरोग्य तपासणी शिबिर

तळोजा, दि.१६। प्रतिनिधी





सद्‌गुरू श्री वामनराव पै



श्री. प्रल्हाद वामनराव पै

# ॥ विश्वप्रार्थना ॥

"हे ईश्वरा,
सर्वांना चांगली बुध्दी दे, आरोग्य दे,
सर्वांना सुखात, आनंदात, ऐश्वर्यात ठेव,
सर्वांचे भलं कर, कल्याण कर, रक्षण कर,
आणि तुझे गोड नाम मुखात
अखंड राहू दे"

सद्‌गुरू श्री. वामनराव पै.

100

१९२३ - २०२३

सद्‌गुरू श्री वामनराव पै

## प्रत्येक कृती ही राष्ट्रहिताची, विश्वशांतीची